

# श्री ज्ञानेश्वरी
## अध्याय सोळावा

या अध्यायाला दैवासुरसंपत्ति विभाग असे नांव दिले आहें . खर तर नवव्या अध्यायात भगवंतानी आसूर माझे अव्यक्त व श्रेष्ठ स्वरूप ओळखीत नाहीत असे जें नुसतें संक्षिप्त विधान केले त्याचे स्वरूप सांगण्यासाठी या अध्यायास सुरवात झाली आहें. त्या अनुषंगाने पंधराव्या अध्यायात ज्ञान, अज्ञान आणि विज्ञान याचे पूर्ण विवेचन केल्यावर हे सम्यक ज्ञान कसे हस्तगत करावे हें सांगताना दैवी व आसुरी संपत्तीचे यात वर्णन केले आहें म्हणून याला दैवासुरसंपत्ति विभाग असे नांव दिले आहें .

यात 24 श्लोक असून त्यावर 473 ओव्या आहेत. अधुनिक संपत्तीची व्याख्या 66 व्या ओवीत अगदी अचूक केली आहें .

यात 24, 66,79,148,156 ते 160,253 या ओव्या फार सुंदर आहेंत.

स्वतः महाराजच 46 व्या ओवीत आता पुढे काही निरुपण करण्याजोगे राहिले नाही असे म्हणतात. पुढील अध्यायात मागील अध्यायात ज्यांचा मोघम उल्लेख केला होता त्यांचेच विस्तृत विवेचन आलें आहें आणि 18 वा अध्याय तर पूर्ण गीतेचे समालोचनच आहें .

67व्या ओवीपर्यंत श्रानिवृत्तिनाथांची स्तुती आहें 1 तें 21, 31 आणि 60 ओव्या या कठीण ओव्या म्हणून समजल्या जातात व त्यांचा अर्थ या अध्यायाचे शेवटी दिला आहें म्हणून त्यातील कठीण सर्व शब्दांचा अर्थ देण्याचे टाळले आहें .

## श्रीज्ञानेश्वरी
## अध्याय सोळावा

मावळवीत विश्वाभासु । नवल उदयला चंडांशु ।
अद्वयाब्जिनीविकाशु । वंदु आतां ।।+1।।
जो , अविद्याराती रुसोनियां , । गिळी ज्ञानाज्ञानचांदणिया , ।
जो , सुदिनु करी ज्ञानिया , । स्वबोधाचा ।।+2।।
जेणे विवळतिये [1] सवळे [2] , । लाहोनि आत्मज्ञानाचे डोळे , । 1 उदयास येणाऱ्या 2 पहाट
सांडिती देहाहंतेची अविसाळे [3] , । जीवपक्षी ।।+3।। 3 घरटी
लिंगदेहकमळाचा । पोटी , वेंचु तया चिद्भ्रमराचा , ।
बंदिमोक्षु जयाचा , । उदैला होय ।।+4।।
शब्दाचिया आसकडी [4] । भेद नदीच्या दोही थडी । 4 अडचणीच्या जागी
आरडाते विरहवेडी । बुद्धिबोधु ।।+5।।
तया चक्रवाकांचे मिथुन । सामरस्याचे समाधान ।
भोगवी जो चिद्गगन । भुवनदिवा ।।+6।।
जेणे पाहालिये पाहाटें । भेदाची चोरवेळ फिटे ।
रिघती आत्मानुभववाटे । पांथिक योगी ।।+7।।
जयाचेनि विवेककिरणसंगे । उन्मेखसूर्यकांतु फुणगे [5] । 5 ठिणगी
दीपले , जाळिती दांगे । संसाराची ।।+8।।
जयाचा रश्मिपुंजु निबरु [6] । होता , स्वरुप उखरी [7] स्थिरु । 6 प्रखर 7 बरड जमीन
ये महासिद्धीचा पुरु , । मृगजळ ते ।।+9।।
जो , प्रत्यग्बोधाचिया [8] माथया । सोऽहंतेचा मध्यान्ही आलिया । 8 आत्मज्ञानाचा
लपे आत्मभ्रांतिछाया । आपणपां तळी ।।+10।।
तें वेळी , विश्वस्वप्नासहिते । कोण अन्यथामती निद्रेतें ।
सांभाळी ? नुरेचि जेंथे । मायाराती ।।+11।।
म्हणौनि , अद्वयबोधपाटणी । तेंथ महानंदाची दाटणी ।
मग सुखानुभुतीची घेणी देणी । मंदावो लागती ।।+12।।
किंबहुना , ऐसैसे । मुक्तकैवल्य सुदिवसे ।
सदा लाहिजें कां प्रकाशे । जयाचेनि ।।+13।।
जो , निजधामव्योमीचा रावो । उदैलाचि , उदैजतखेवो ।
फेडी पूर्वादि दिशांसि ठावो । उदोअस्तूचा ।।+14।।
न दिसणे,दिसणेनसी मावळवी,। दोही झांकिले तें सैंध पालवी ।
काय बहु बोलो ! ते आघवी । उखाचि [9] आनी ।।+15।। 9 उषःकाल
तो अहोरात्रांचा पैलकडु । कोणे देखावा ज्ञानमार्तंडु ! ।
जो , प्रकाश्येवीण सुरवाडु । प्रकाशाचा ।।+16।।

| | |
|---|---|
| तया चित्सूर्या श्रीनिवृत्ती । आतां नमो म्हणो पुढतपुढती । | |
| जें बाधका येइजतसे स्तुती । बोलाचिया ।।+17।। | |
| देवाचे महिमान पाहोनियां । स्तुती तरी येईजें चांगावया । | |
| जरी स्तव्यबुद्धीसी लया । जाईजे कां ।।+18।। | |
| जो , सर्वनेणिवां जाणिजे , । मौनाचिया मिठीया वानिजे । | |
| काहीच न होनि आणिजे । आपणपयां जो ।।+19।। | |
| तया तुझिया उद्देशासाठी । पश्यंती मध्यमा पोटी । | |
| सुनि , परेसीही पाठी । वैखरी विरे ।।+20।। | |
| तया तूंतें मी सेवकपणे । लेववी बोलकेया स्तोत्राचे लेणे । | |
| हें उपसाहावेही म्हणता उणे , । अद्वयानंदा ।।+21।। | |
| परी,रंके अमृताचा सागरु । देखिलिया,पडे उचिताचा [1] विसरु । | 1 योग्य |
| मग करुं धांवे पाहुणेरु [2] । शाकांचा [3] तया ।।22।। | 2 पाहुणाचार 3 भाज्यांचा |
| तेंथ,शाकुही कीर बहुत म्हणावा ! । तयाचा हर्षवेगुचि तो घ्यावा,। | |
| उजळोनि,दिव्यतेजा हातिवा [4] । तें भक्तीचि पाहावी ।। 23।। | 4 काडवात |
| **बाळा उचित जाणणे होये , । तरी बाळपणचि के आहे !।** | |
| **परी , साचचि , येरी माये । म्हणौनि तोषे ।।24।।** | |
| हां , गा ! गांवरसे [5] भरले । पाणी , पाठी पाय देत आलें , । | 5 गावातील घाण पाणी |
| ते , गंगा काय म्हणितले , । '' परते सर '' ? ।।25।। | |
| जी , भृगुचा कैसा अपकारु ! । की , तो मानूनि प्रियोपचारु , । | |
| तोषेचिना शाङर्गधरु । गुरुत्वासी [6] ।।26।। | 6 गुरुप्रसाद समजून |
| कीं , आंधारे खतेले [7] अंबर । झालेया दिवसनाथासमोर , । | 7 भरलेले |
| तेंणे , तयाते '' पऱ्हा सर '' । म्हणितले काई ? ।।27।। | |
| तेवी , भेदबुद्धीचिये तुळे [8] । घालूनि सूर्यश्लेषाचे कांटाळे [9] । | 8 तुलनेंने 9 सूर्याचे |
| तुकिलासि , ते येकीं वेळे । उपसहिजो जी ।।28।। | बरोबरीचे वजन |
| जिही [10] ध्यानाचा डोळा पाहिलासी,। वेदादि वाचां वानिलासा । | 10 ज्या योग्यांनी |
| जे उपसाहिले तयासि । ते , आम्हाही करी ।।29।। | |
| परी मी आजि तुझ्या गुणी । लांचावलों [11],अपराधु न गणी । | 11 शेफारलो |
| भलते करी , परी अर्धधणी [12] । नुठी कदा ।।30।। | 12 अर्धवट तृप्त |
| मिया गीता येणे नांवे । तुझे पसायामृत सुहावे [13] । | 13 सेवन करितो |
| वानूं लाधलो , ते दुणेन थावे [14] । दैवलो [15] दैवे ।।+31।। | 14 बळाने 15 सुदैवी |
| माझिया सत्यवादाचे तप । वाचा केले बहुत कल्प , । | झालो |
| तया फळाचे हें महाद्वीप । पातली प्रभु ।।32।। | |
| पुण्ये पोशिली [16] असाधारणे , । तिये , तुझे गुण वानणे । | 16 आचरली |
| देऊनि मज , उत्तीर्णे [17] । जाली आजी ।।33।। | 17 उतराई |

जी , जीवित्वाच्या आडवी [1] । आतुडलो [2] होतो मरणगांवी , ।
ते , अवदसाचि आघवी । फेडिली आजी ।।34।।
जे गीता येणे नांवे नावाणिगी [3] । जे अविद्या दाटुगी [4] , ।
ते कीर्ती तुझी आम्हांजोगी । वानावया जाली ।।35।।
पै , निर्धना घरी वानिवसें [5] , । महालक्ष्मी येऊनि बैसे , ।
तयाते निर्धन ऐसे । म्हणो ये काई ? ।।36।।
कां , अंधकाराचिया ठाया , । दैवे , सूर्यु आलिया , ।
तो अंधारुचि जगा यया । प्रकाशु नोहे ? ।।37।।
जया देवाची पाहतां थोरी , । विश्व परमाणुही दशा न धरी ।
तो भावाचिये सरोभरी [6] । नव्हेचि काई ? ।।38।।
तैसा , मी गीता वाखाणी , । हे , खपुष्पाची तुरंबणी [7] ।
परी , समर्थे तुवां शिरयाणी [8] । फेडिली तें ।।39।।
म्हणौनि , तुझेनि प्रसादे । मी गीतापद्ये अगाधे ।
निरूपीन जी ! विशदे [9] ” । ज्ञानदेवो म्हणे ।।40।।
तरी , अध्यायी पंधरावा । श्रीकृष्णे तया पांडवा ।
शास्त्रसिद्धांतु आघवा । उगाणिला [10] ।।41।।
जे, वृक्षरूपक परिभाषा । केले , उपाधि रूप अशेषा [11] ।
सद्वैद्ये जैसे दोषा । अंगलीना [12] ।।42।।
आणि , कूटस्थु [13] जो अक्षरु , । दाविला पुरुषप्रकारु , ।
तेंणे , उपहिताही [14] आकारु । चैतन्या केला ।।43।।
पाठी , उत्तम पुरुष , । शब्दाचे करूनि मिष , ।
दाविले चोख , । आत्मतत्त्व ।।44।।
आत्मविषयी आंतुवट [15] । साधन जे आंगदट [16] ।
ज्ञान , हेही स्पष्ट । चावळला [17] ।।45।।
म्हणौनि , इये अध्यायी । निरुप्य नुरेचि कांही ।
आतां गुरुशिष्यां दोही । स्नेहो लाहणा [18] ।।46।।
एवं , इयेविषयी कीर । जाणते , बुझावले [19] अपार ।
परी , मुमुक्षु [20] इतर , । साकांक्ष [21] जाले ।।47।।
त्या मज पुरुषोत्तमा । ज्ञाने भेटे जो सुवर्मा , ।
तो , सर्वज्ञु , तोचि सीमा । भक्तीचीही ।।48।।
ऐसे हे त्रैलोक्यनायके । बोलिले अध्यायांत श्लोके ।
तेंथे ज्ञानचि बहुतेके , । वानिले तोषे ।।49।।
भरूनि प्रपंचाचा घोटु [22] । कींजे देखतांचि , देखतया द्रष्टु , ।
आनंदसाम्राज्यी पाटु [23] । बांधिजे जीवा ।।50।।

1 देहसंबंधाच्या आड-
रानात 2 अडकलो होतो
3 प्रसिद्ध 4 बलवान
5 अचानक
6 भक्तीच्या भरात
7 आकाश पुष्पाचा वास घेणे
8 आवड
9 स्पष्ट
10 स्पष्ट केला
11 संपुर्णपणे
12 अंगात गुप्त असलेले
13 देहातील जीव
14 उपाधियुक्ताला
15 अंतस्थ 16 बळकट
17 विवेचन केले
18 देव घेव
19 समजावले
20 मर्मज्ञ 21 शंकींत
22 नाश
23 पट्टाभिषेक

येवढेया लाठेपणाचा[1] उपावो । आनु नाहीचि म्हणे देवो ।
हा सम्यक् ज्ञानाचा रावो , । उपायांमाजी ।।51।।
ऐसे आत्मजिज्ञासु जे होते , । तिही तोषलेनि चित्ते ।
आदरे तया ज्ञानाते । वोवाळिले जीवे ।।52।।
आतां , आवडी जेथ पडे , । तयाची अवसरी[2] , " पुढे पुढे ।
रिगो लागे , " हे घडे , । प्रेम ऐसे ।।53।।
म्हणौनि , जिज्ञासूंच्या पैकीं, । ज्ञानी प्रतीति होय ना जंव निकीं , ।
तंव , योग क्षेमु [3]ज्ञानविखी । स्फुरेलचि कीं ।।54।।
म्हणौनि , तेचि सम्यक् ज्ञान । कैसेनि होय स्वाधीन , ।
जालिया , वृद्धियत्न[4] । घडेल केवी ? ।।55।।
कां , उपजोचि जे न लाहे , । जे उपजलेही अव्हांटा सूये[5] ।
ते , ज्ञानी विरुद्ध काय आहे ? । हें जाणावे कीं ! ।।56।।
मग जाणतया जे विरू[6] । तयाची वाट वाहती करूं[7]।
ज्ञाना हित , तेचि विचारूं । सर्वभावे ।।57।।
ऐसा ज्ञानजिज्ञासु तुम्ही समस्ती । भावो जो धरिला असे चित्ती , ।
तो पुरवावया लक्ष्मीपती । बोलिजेल ।।58।।
ज्ञानासि सुजन्म जोडे , । आपुली विश्रांतिही वरी वाढे , ।
तें संपत्तीचे पवाडे[8] । सांगिजेल दैवी ।।59।।
आणि , ज्ञानाचेनि कामाकारे[9] । जे , रागद्वेषासि दे थारे , ।
तिये आसुरियेहि घोरे[10] । करील रूप ।।60।।
सहज इष्टानिष्टकरणी । दोघीचि इया कवतुकिणी ।
हें नवमाध्यायी उभारणी । केली होती ।।61।।
तेंथ साउमा[11] घेयावया उवावो[12]।तंव वोडवला[13]आन प्रस्तावो ।
तरी तया , प्रसंगे , आतां देवो । निरुपीत असे ।।62।।
तया निरूपणाचेनि नांवे । अध्याय पद सोळावे , ।
लावणी पाहतां[14] , जाणावे । मागिलावरी ।।63।।
परी हें असो ; आतां प्रस्तुती । ज्ञानाच्या हिताहिती ।
समर्था , संपत्ती । इयाचि दोन्ही ।।64।।
जे मुमुक्षमार्गीची बोळावी[15] । जें मोहरात्रीची धर्मदीवी[16] ।
तें आधी तंव दैवी । संपत्ती ऐका ।।65।।
**जेथ एक एकाते पोखी[17] । ऐसे बहुत पदार्थ येकीं[18] ।**
**संपादिजती , ते लोकीं । संपत्ती म्हणिजे ।।66।।**
तें दैवी सुखसंभवी । तेंथ दैवगुणे येकोपजीवी[19] ।
जाली , म्हणौनि दैवी । संपत्ति हे ।।67।।

1 बलवत्तर
2 प्रसंगी, वेळी
3 आत्मज्ञानाविषयी उत्सुक
4 वाढ
5 आडमार्गाला धाडते
6 प्रतीकुल 7 दूर करू
8 महत्व
9 अंकींतपणे
10 भयंकर
( 12 व 13व्या श्लोकात )
11 प्रत्यक्ष 12 समग्र विचार 13 समोर आला
14 संदर्भ पाहता
15 पोचवीणारी
16 धर्मदीवटी17 पोसते
18 एक एकाला वाढवते
19 एकाच आश्रयाला आली

**श्रीभगवानुवाच**

**अभयं सत्त्वसंशुध्दिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ।**
**दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम ।।1।।**

**श्रीभगवान म्हणाले अभय, शुद्ध सात्त्विक वृत्ति, ज्ञानयोगव्यवस्थिति म्हणजे ज्ञान मार्ग व कर्म मार्ग यांची तारतम्याने व्यवस्था, दातृत्व,दम,यज्ञ, स्वाध्याय म्हणजे स्वधर्माप्रमाणे आचरण, तप ,सरळपणा ,**

आतां , तयाचि दैवगुणां-। माजी , धुरेचा बैसणा [1] । — 1 पुढे बसणारा
बैसे , तया आकर्णा [2] । अभय ऐसे ।।68।। — 2 ऐका
तरी ना घालूनि महापुरी , । न घेपे [3] , बुडणयाची शियारी [3] । — 3 घेत नाही 4 शहारे
कां , रोगु न गणिजे घरी । पथ्याचिया ।।69।।
तैसा , कर्माकर्माचिया मोहरा [5] । ऊठूं नेदूनि अहंकारा । — 5 मार्गाकडे
संसाराचा दरारा [6] । सांडणे येणे ।।70।। — 6 भय
अथवा,ऐक्यभावाचेनि पैसे [7] ,। दुजे मानूनि "आत्मा ऐसे , "। — 7 मार्गाने
भयवार्ता देशे । दवडणे जे ।।71।।
पाणी बुडऊं ये मिठाते , । तंव, मीठचि पाणी आते [8] । — 8 बनते
तेवी , आपण जालेनि अद्वैतें , । नाशे भय ।।72।।
अगा ! अभय येणे नांवे । बोलिजें , ते, हे जाणावे ।
सम्यक्ज्ञानाचे आघवे । धावणे [9] हें ।।73।। — 9 रक्षक
आतां , सत्त्वशुद्धी जें म्हणिजे , । ते ऐशा चिन्ही जाणिजे , ।
तरी , जळे ना विझे । राखोंडी जैसी ।।74।।
कां,पाडिवा [10] वाढी न मगे [11] । अंवसे तुटी [12] सांडुनि मागे । — 10 प्रतिपदा 11 मागत
माजी , अतिसुक्ष्म अंगे । चंद्रु जैसा राहे ।।75।। — नाही 12 कमीपणा
नातरी,वार्षिया नाही मांडिली [13] ,। ग्रीष्मे नाही सांडिली,। — 13 व्यापली
माजी , निजरूपे निवडली [14] । गंगा जैसी ।।76।। — 14 स्पष्ट झाली
तैसी,संकल्पविकल्पाची वोढी [15] । सांडूनि,रजतमाची कावडी [16]। — 16 ओढ 17 कावड
भोगिता निजधर्माची आवडी । बुद्धी उरे ।।77।।
इंद्रियवर्गी दाखविलिया , । विरुद्धा आथवा भलीया [18] , । — 18 चांगले
विस्मयो काही केलिया । नुठी चित्ती ।।78।।
**गांवा गेलिया वल्लभु , । पतिव्रतेचा विरहक्षोभु ।**
**भलतेसणी [19] हानिलाभु । न मनी जेवी ।।79।।** — 19 हवी तेवढी
तेवी,सत्स्वरूप रुचलेपणे [20]। बुद्धी जे ऐसे अनन्य होणे,। — 20 रुचते
तें सत्त्वशुद्धी म्हणे । केशिहंता ।।80।।
आतां, आत्मलाभाविखी । ज्ञानयोगामाजी एकीं , । — 21 आपली योग्यता
जे आपुलिया ठाकीं [21] । हांवे भरे [22] ।।81।। — 22 लोभ वाढतो

तेंथ , सगळिये चित्तवृत्ती । त्यागु करणे , या रीती ।
निष्कामे पूर्णाहुती । हुताशी जैसी ।।82।।
कां , सुकुळीने आपुली । आत्मजा , सत्कुळीचि दिधली ।
हें असो ; लक्ष्मी स्थिरावली । मुकुंदी जैसी ।।83।।
तैसे , निर्विकल्पपणे । जे योगज्ञानीच या वृत्तिक होणे [1] ।
तो तिजा गुण म्हणे । श्रीकृष्णनाथु ।।84।।
आतां , देहवाचाचित्ते, । यथासंपन्ने वित्ते , ।
वैरी जालियाही आर्तांते । न वंचणे जे कां ! ।।85।।
पत्र ,पुष्प , छाया , । फळ , मूळ , धनंजया ! ।
वाटेचा , न चुके आलिया । वृक्षु जैसा ।।86।।
तैसे , मनौनि[2] धनधान्यवरी । विद्यमाने [3] ,आल्या अवसरी ।
श्रांताचिये मनोहारी । उपयोगा जाणे ।।87।।
तया नांव जाण दान । जे मोक्षनिधानाचे अंजन ।
हें असो ; आइक चिन्ह । दमाचे ते ।।88।।
तरी विषयेंद्रियां मिळणी । करूनि , घापे वितुटणी [4] ।
जैसे , खड्पाणी [5] । पारकेया [6] ।।89।।
तैसा , विषयजातांचा वारा । वाजो नेदिजे इंद्रियद्वारा , ।
इये बांधोनि प्रत्यहारा [7] । हाती वोपी [8] ।।90।।
आंतुला चित्ताचे अंगवरी [9] । प्रवृत्ति पळे पर बाहेरी ।
आगी सुयिजे दाहीहि द्वारी । वैराग्याची ।।91।।
श्वासोश्वासाहुनी बहुवसे । व्रतें , आचरे खरपुसे ।
वोसंतिता [10] रात्रिदिवसे । नाराणुक [11] जया ।।92।।
पै , दमु ऐसा म्हणिपे ,। तो हा जाण स्वरुपे ।
यागार्थुहि संक्षेपे । सांगो ऐक ।।93।।
तरी , ब्राह्मण करूनि धुरे [12]। स्त्रियादिक पैल मेरे [13] ।
माझारी , अधिकारे । आपुलालेनि , ।।94।।
जया जे सर्वोत्तम , । भजनीय देवताधर्म , ।
तें तेणे , यथागम [14]। विधी , यजिजे ।।95।।
जैसा , द्विज षट्कर्मे करी । शूद्र तयाते नमस्कारी , ।
कीं दोहीसही सरोभरी [15] । निपजे यागु ।।96।।
तैसे , अधिकारपर्यालोचे [16] । हें यज्ञ करणे सर्वांचे ।
परी , विषय विष फळाशेचे । न घापे माजी [17] ।।97।।
आणि , ' मी कर्ता ' ऐसा भावो । नेदिजे देहाचेनि द्वारे जावो , ।
ना [18] , वेदाज्ञेसि तरी , ठावो । होइजे [19] स्वये ।।98।।

1 वतनदार होणे
2 मनापासून सुरवात करून
3 जवळ आलेल्या
4 ताटातुट करवतो
5 गढूळ पाणी 6 निवळीच्या बीने
7 अष्टांग योगाच्या
8 हातात देतो 9 स्वभावतः
10 आचरण करताना
11 समाधान
12 सुरवात करून
13 शेवट पर्यंत
14 यथाशास्त्र
15 सारख्या योग्यतेचा
16 अधिकारानुरुप विचार करता
17 फळाशेचे विष त्यात कालवू नये
18 एऱ्हवी 19 पाळणे

अर्जुना ! एवं यज्ञु ,। सर्वत्र जाण साङ्गु [1] । — 1 सशास्त्र
कैवल्यमार्गीचा अभिज्ञु [2] । सांगाती [3] हा ।।99।। — 2 माहीतगार 3 वाटाड्या
आतां , चेडुवे भूमी हाणिजे । नव्हे , तो हाता आणिजे , ।
कीं , शेती बी विखुरिजे [3] , । परी , पिकीं लक्ष ।।100।। — 3 पसरणे
नातरी , ठेविले देखावया । आदर कींजे [4] दिविया , । — 4 लावणे
कां , शाखा , फळे यावया , । सिंपिजे मूळ ।।101।।
हें बहु असो ; आरिसा , । आपणपें देखावया , जैसा ।
पुढतपुढती बहुवसा । उटिजे प्रीती ।।102।।
तैसा , वेदप्रतिपाद्यु जो ईश्वरु , । तो होआवयालागी गोचरु , ।
श्रुतीचा निरंतरु , । अभ्यासु करणे , ।।103।।
तेचि , द्विजांसीच ब्रह्मसूत्र , । येरा , स्तोत्र कां नाममंत्र ।
अवर्तवणे पवित्र । पावावया तत्त्व [5]।।104।। — 5 शुद्धचैतन्यप्राप्ती करिता
पार्था गा ! स्वाध्यावो । बोलिजे ," तो हा " म्हणे देवो ।
आतां , तप शब्दाभिप्रावो । आईक सांगो ।।105।।
तरी , दाने सर्वस्व देणे , । वेचणे , ते व्यर्थ करणे ।
जैसे , फळोनि , स्वये सुकणे , । इंद्रावणी [6] जेवी ।।106।। — 6 कडु वृंदावनाची वेल
नाना , धूपाचा अग्निप्रवेशु , । कनकीं तुकाचा [7] , नाशु । — 7 वजनाचा
पितृपक्षु पोषिता ऱ्हासु । चंद्राचा जैसा ।।+107।।
तैसा , स्वरुपाचिया प्रसरा-। लागी , प्राणेंद्रियशरीरां ।
आटणी करणे जें वीरा ! । तेचि तप ।।108।।
अथवा , अनारिसे । तपाचे रूप जरी असे ।
तरी जाण , जेवी दुधी हंसे । सूदली चांचू ।।109।।
तैसे,देहजीवाचिये मिळणी [8],। जो उदयजत,सूये पाणी[9]। — 8 ऐक्यतेत 9 त्याग करतो
तो विवेक अंतःकरणी । जागवीजे ।।110।।
पाहतां आत्मयाकडे , । बुद्धीचा पैसु सांकडे [10] । — 10 मार्ग संकोचतो
सनिद्र स्वप्न बुडे । जागणी जैसे ।।111।।
तैसा , आत्मपर्यालोचु [11] । प्रवर्ते जो साचु , । — 11 विचार
तपाचा हा विर्वेचु [12] , । धनुर्धरा ! ।।112।। — 12 अभिप्राय
आतां,बाळाच्या हिती स्तन्य,। जैसे,नानाभूती चैतन्य,।
तैसे , प्राणिमात्री सौजन्य । आर्जव ते ।।113।।

**अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शांतिरपैशुनम् ।**
**दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ऱ्हीरचापलम् ।।2।।**

**अहिंसा,सत्य,क्रोध नसणे, कर्मफलत्याग,शांति,अपैशुन्य म्हणजे क्षुद्र दृष्टि सुटुन उदारबुद्धि असणे,सर्व भूतांचे ठायी दया,हावरेपणा नसणे,मृदुपणा,वाईट कृत्याची लाज,अचापल म्हणजे रिकामे व्यापार सुटणे ,**

| | |
|---|---|
| आणि जगाचिया सुखोद्देशे , । शरीरवाचामानसे । | |
| राहाटणे , ते अहिंसे । रूप जाण ।।114।। | |
| आतां , तीख होऊनि मवाळ , । जैसे जातीचे मुकुळ [1] । | 1 कमळ कळी |
| कां तेज , परी शीतळ । शशांकाचे [2] ।।115।। | 2 चंद्र |
| शके दावितांचि रोगु फेडूं , । आणि जिभे तरी नव्हे कडू , । | |
| तें वोखदु [3] नाही , मा घडु । उपमा कैची ! ।।116।। | 3 औषध |
| तरी , मऊपणे , बुबुळे । झगडतांही परी नाडळे [4] , । | 4 खुपत नाही |
| एऱ्हवी , फोडी कोराळे [5] , । पाणी जैसे ।।117।। | 5 डोंगराचे कडे |
| तैसे , तोडावया संदेह [6] , । तीख जैसे कां लोह , । | 6 संशय |
| श्राव्यत्वे तरी , माधुर्य । पायी घाली ।।118।। | |
| ऐको ठातां , कौतुके । कानाते निघती मुखे , । | |
| जे , साचारिवेचेनि [7] , बिके [8] । ब्रह्मही भेदी ।।119।। | 7 खरेपणाने 8 बळाने |
| किंबहुना , प्रियपणे , । कोणातेही झकऊं नेणे [9] । | 9 फसवत नाही |
| यथार्थ , तरी खुपणे । नाही , कवणा ।।120।। | |
| एऱ्हवी,गोरी [10] कीर काना गोड,। परी साचाचा,पाखाळी कींड [11]। | 10 पारध्याचे गाणे |
| आगीचे करणे उघड , । परी , जळो तें साच ।।121।। | 11 निर्णयाअंती वाईट |
| कानी लागतां महूर [12] ।अर्थे , विभांडी जिव्हार [13] , । | 12 गोड 13 हृदयाला |
| तें वाचा नव्हे , सुंदर । लांवचि [14] पां ! ।।122।। | झोंबतें 14 राक्षसी |
| परी , अहिती कोपोनि सोप [15] , । लालनी मऊ जैसे पुष्प , । | 15 लटके |
| तिये मातेचे स्वरूप । जैसे कां होय , ।।123।। | |
| तैसे , श्रवणसुख ,चतुर ,। परिणमोनि [16] साचार । | 16 परीणामी |
| बोलणे जे अविकारी , । ते , सत्य येथे ।।124।। | |
| आतां , घालिताहि पाणी , । पाषाणी न निघे आणी [17] । | 17 अंकुर |
| कां , मथिलिया , लोणी , । कांजी नेदी[18] ।।125।। | 18 भाताच्या पेजेतून निघत नाही |
| त्वचा [19] , पायें शिरी । हालेयाही [20] फडे न करी , । | 19 सापाची कात 20 पायाने |
| वसंतीही अंबरी । न होती फुले ।।126।। | हाणले असता |
| नाना , रंभेचेनिही रूपे , । शुकीं नुठिजे कंदर्पे [21] । | 21 काम |
| कां , भस्मी , वन्हिी न उद्दीपे । घृतेही जेवी ।।127।। | |
| तेवीचि, कुमारु क्रोधे भरे ।तेसिया मंत्राची बीजाक्षरे [22] । | 22 शेलक्या शिव्यांची |
| तिये , निमित्तेही अपारे । मीनलिया [23] ।।128।। | अक्षर 23 मिळाली असता |
| पै , धातयाही [24] पायां पडता , । नुठी , गतायु पंडुसुता ! । | 24 ब्रह्मदेवाच्या |
| तैसी , नुपजे उपजवितां । क्रोधोर्मी गा ! ।।129।। | |
| अक्रोधत्व ऐसे । नांव , ते ये दशे । | |
| जाण , ऐसे श्रीनिवासे । म्हणितले तया ।।130।। | |

आतां , मृत्तिकात्यागे घटु , । तंतुत्यागे पटु , ।
त्यजिजे जेवी वटु , । बीजत्यागे ।।131।।
कां , त्यजूनि भिंतीमात्र , । त्यजिजे आघवेचि चित्र , ।
कां , निद्रात्यागे , विचित्र । स्वप्नजाळ [1] ।।132।।    1 स्वप्नातील चाळे
नाना , जळत्यागे तरंग , । वर्षात्यागे मेघ , ।
त्यजिजे जैसे भोग । धन्यत्यागे ।।133।।
तेवी , बुद्धिमंती , देही । अहंता सांडूनि , पाही ।
सांडिजे अशेषही । संसारजात ।।134।।
तया नांव त्यागु । म्हणे तो यज्ञांगु ।
हें मानूनि , सुभगु । पार्थु पुसे ।।135।।
'' आतां , शांतीचे लिंग । तें व्यक्त मज सांग '' ।
देवो म्हणती , '' चांग , । अवधान देई ।।136।।
तरी गिळोनि ज्ञेयाते । ज्ञाता , ज्ञानही माघौते ।
हारपे निरुतें [2] । तें , शांति पै गा ! ।।137।।    2 संपूर्णपणे
जैसा , प्रळयांबूचा उभडु [3] । बुडवूनि विश्वाचा पवाडु [4] ।    3 पूर 4 महत्व
होय आपणपें निबिडु [5] । आपणचि ।।138।।    5 घनदाट
मग , उगम , ओघ , सिंधु । हा नुरेचि व्यवहार भेदु ।
परी जलैक्याचा [6] बोधु । तोही कवणा [7] ।।139।।    6 सगळीकडे पाणीच पाणी
तैसी , ज्ञेया देतां मिठी , । ज्ञातृत्वही पडे पोटी , ।    झाल्यावर 7 कोणाला
मग उरे , तेचि किरीटी ! । शांतीचे रूप ।।140।।
आतां , कदर्थवीत [8] व्याधी , । बळीकरणाचिया [9] आधी ।    8 दुःख देणाऱ्या 9 बळकट
आपपरु न शोधी । सद्वैद्यु जैसा ।।141।।    होण्याच्या
कां , चिखली रुतली गाये , । धडभाकड न पाहे , ।
जो तियेचिया ग्लानी [10] , होये । कालाभुला [11] ।।142।।    10 संकटाने 11 कासावीस
नाना , बुडतयाते , सकरुणु । न पुसे , अंत्यजु कां ब्राह्मणु , ।    होतो
काढूनि राखे प्राणु , । हेचि जाणे ।।143।।
की , माय , वनी पापिये । उघडी केली विपाये [12] , ।    12 दुर्दैवाने 13 अज्ञानामुळे
तें , नेसल्यावीण न पाहे । शिष्टु जैसा , ।।144।।    गैरकृत्य करणारे
तैसे,अज्ञानप्रमादादिकीं [13] ,। कां, प्राक्तनहीन [14] ,सदोखी[15] ।    14 दुर्दैवी 15 दोषी
निंदत्वाच्या सर्वविखी [16] । खिळिले जे , ।।145।।    16 सर्व दोषांनि
तया , आंगीक [17] आपुले ।देऊनिया भले , ।    17 स्वाभाविकपणे
विसरविजती सले [18] । सलती तिये ।।146।।    18 शल्य
अगा ! पुढिलाचा दोखु , । करूनि आपुलिये दिठी चोखु , ।
मग घापे अवलोकु [19] । तयावरी ।।147।।    19 दृष्टी घालतो

**जैसा , पुजूनि देवो पाहिजे , । पेरूनि शेता जाइजे , ।**
**तोषोनि प्रसादु घेईजें । अतिथीचा ।।148।।**
तैसे , आपुलेनि गुणे , । पुढिलाचे उणे ।
फेडुनियां पाहणे , । तयाकडे ।।149।।
वांचूनि , न विंधिजे वर्मी , । नातुडविजे [1] अकर्मी , । — 1 न गुंतवणे
न बोलविजे नामी । सदोषी तिही ।।150।।
वरी , कोणे एके उपाये , । पडिले ते उभे होये ।
तेचि कींजे , परी घाये [2] । नेदावे वर्मी ।।151।। — 2 घात
पै , उत्तमाचियासाठी [3] । नीच मानिजें किरीटी ! । — 3 उत्तमाच्या बरोबरीने
हें वांचोनि , दिठी । दोषु न घेपे ।।152।।
अगा ! अपैशून्याचे लक्षण । अर्जुना ! हे फुडे जाण ।
मोक्षमार्गीचे सुखासन । मुख्य हे गा ।।153।।
आतां , दया ते ऐसी , । पूर्णचंद्रिका जैसी , ।
निववितां न कडसी [4] , । साने , थोर ।।154।। — 4 भेदभाव करित नाही
तैसे , दुःखिताचे शिणणे । हिरतां सकणवपणे , ।
उत्तमाधम नेणे । विवंचू गा ।।155।।
**पै , जगी जीवनासारिखे । वस्तु , अंगवरी उपखे [5] ।** — **5 स्वतः नाश पावतें**
**परी , जाते जीवित राखे । तृणाचेहि ।।156।।**
**तैसे , पुढिलाचेनि तापे । कळवळलिये , कृपे ।**
**सर्वस्वेसी दिधलेहि आपणपें , । थोडेचि गमे ।।157।।**
**निम्न [6] भरलियाविणे । पाणी ढळोचि नेणे , ।** — 6 खड्डा
**तेवी , श्रांता [7] तोषौनि जाणे । सामोरे पां ! ।।158।।** — **7 श्रमलेल्या**
**पै , पायीं कांटा नेहटे [8] , । तंव , व्यथा जीवी उमटे ।** — **8 रुतणे**
**तैसा , पोळे , संकटे । पुढिलाचेनि ।।159।।**
**कां , पावो शीतळता लाहे , । कीं तें डोळ्याचिलागी होये ।**
**तैसा , परसुखे जाये । सुखावतु ।।160।।**
किंबहुना , तृषितालागी । पाणी आरायिले [9] असे जगी । — 9 उत्पन्न केले आहे
तैसे , दुःखितांचे सेलभागी [10] । जिणे जयाचे ।।+161।। — 10 दुःखनिवारणार्थ
तो पुरुष वीरराया ! ।मूर्तिमंत जाण दया ।
मी उदयजतांचि तया । ऋणिया लाभे ।।+162।।
आतां , सूर्यासि जीवे । अनुसरलिया , राजीवे [11] । — 11 सूर्यकमळ
परी , ते तो न शिवे । सौरभ्य , जैसे ।।163।।
कां,वसंताचिया वाहाणी[12] । आलिया वनश्रीच्या अक्षौहिणी । — 12 वसंतातील वनशोभा
तें न करीतुचि घेणी , । निगाला तो ।।164।।

हें असो ; महासिद्धसी । लक्ष्मीही आलिया पाशी , ।
परी महाविष्णु जैसी । न गणीच तें ।।165।।
तैसे,ऐहिकीचे  कां स्वर्गीचे,। भोग पाईक [1] जालिया ईच्छेचे । 1 सेवक
परी , भोगावे , हे न रुचे । मनामाजी ।।166।।
बहुवे काय कौतुकीं , । जीव नोहे विषयाभिलाखी ।
अलोलुप्त्वदशा ठाउकीं । जाण  , ते  हे ।।167।।
आतां , माशियां जैसे मोहळ , । जळचरां जेवी जळ , ।
कां , पक्षीया अंतराळ , । मोकळे हे ।।168।।
नातरी , बाळकोद्देशे , । मातेचे स्नेह जैसे , ।
कां , वसंतीच्या स्पर्शे । मउ  मलयनिळु ।।169।।
डोळ्या  प्रियाची भेटी , । कां , पिलियां कुर्मीची दिठी , ।
तैसी , भूतमात्रीं राहटी [2] । मवाळ ते ।।170।। 2 वागणे
स्पर्शे अतिमृदु , । मुखी घेतां , सुस्वादु , ।
घ्राणासि सुगंधु , ।उजाळु [3] आंगे , ।।171।। 3 स्वच्छ
तो आवडे तेवढा घेतां , । विरुद्ध  जरी न होतां , ।
तरी ,  उपमे येता । कापूर कीं ।।172।।
परी,महाभूते पोटी वाहे । तेवीचि परमाणूमाजी सामाये ।
या विश्वानुसार होये । गगन जैसे , ।।173।।
काय सांगो ! ऐसे जिणे । जे , जगाचेनि जीवे प्राणे ।
तयां नांव  म्हणे । '' मार्दव ''  मी ।।174।।
आतां , पराजये राजा । जैसा कदर्थिजे [4] लाजा । 4 दुःखित होतो
कां , मानिया निस्तेंजा , । निकृष्टास्तव [5] ।।175।। 5 नीचपणामुळे
नाना , चांडाळ मंदिराशी । अवचटे आलिया , संन्यासी ।
मग , लाज होय जैसी । उत्तमा तया ।।176।।
क्षत्रिया रणी पळोनि जाणे । तें कोण साहे लाजिरवाणे ! ।
कां , वैधव्यें पाचारणे [6] । महासतियेते ।।177।। 6 हाक मारणे
रूपसा [7] उदयले कुष्ट  , । संभावितां कुटीचे बोट [8] । 7 रूपवतीला 8 निंदेचा डाग
तया लाजा , प्राणसंकट । होय जैसे ।।178।।
तैसे , औटहातपणे [9] । जे शव होऊनि जिणे , । 9 साडेतीन हात
उपजो , उपजो , मरणे । नावानावा [10] ।।179।। 10 वारंवार
तिये गर्भमेदमुसे । रक्तमूत्ररसे ।
वोतीव [11] होऊनि असे । तें लाजिरवाणे ।।180।। 11 पुतळा
हें बहु असो ; देहपणे । नामरूपासि येणे , ।
नाही गा  ! लाजिरवाणे । तयाहूनि ।।181।।

ऐसैसिया अवकळा [1] । घेपे शरीराचा कंटाळा ।
तें लाज पै निर्मळा [2] , । निसुगा [3] गोड ।।182।।
आतां , सूत्रतंतु तुटलिया , । चेष्टाचि ठाके सायखडिया [4] ।
तैसी , प्राणजये [5] कर्मेंद्रिया । खुंटे गती ।।183।।
कीं , मावळलिया दिनकरु , । सरे किरणांचा प्रसरु , ।
तैसा, मनोजये प्रकारु , । ज्ञानेंद्रियांचा ।।184।।
एवं , मनपवननियमे , । होती दाही इंद्रिये अक्षमे ।
तें , अचापल्य वर्मे । येणे होय ।।185।।

1 हीनतेंने
2 साधुला 3 कोडग्याला
4 कळसूत्री बाहुलीला
5 प्राणापानावर जय मिळवल्यानंतर

**तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ।**
**भवन्ति संपदं दैवीमभिजातस्य भारत ।।3।।**

**तेंजस्विता,क्षमा,धृति,शुचिर्भूतपणा,द्रोह न करणे, अतिमान नसणे हें गुण हें भारता ! दैवी संपत्तीत जन्मलेल्या पुरषास प्राप्त होतात.**

आतां , ईश्वरप्राप्तीलागी , । प्रवर्तता ज्ञानमार्गी ।
धिंवसेयाचि [6] आंगी । उणीव नोहे ।।186।।
वोखटे [7] मरणाऐसे । तेही आलें अग्निप्रवेशे , ।
परी , प्राणेश्वरोद्देशे , । न गणीचि सती ।।187।।
तैसे,आत्मनाथाचिया आधी [8]। लाऊनि [9] विषयविषाची बाधी[10] ।
धांवो आवडे पाणधी [11] । शून्याचिये ।।188।।
न ठाके निषेधु आड , । न पडे विधीची भीड , ।
नुपजेचि जीवी कोड । महासिद्धीचे ।।189।।
ऐसे , ईश्वराकडे निज [12] । धांवे , आपसया सहज , ।
तया नांव तेंज । अध्यात्मिक ते ।।190।।
आतां,सर्वही साहातिया गरिमा [13] ।गर्वा न ये,तेचि क्षमा [14] ।
जैसे देह , वाहोनि रोमा , । वाहणे नेणे ।।191।।
आणि,मातलिया इंद्रियांचे वेग । कां,प्राचीने [15] खवळले रोग,।
अथवा , योगवियोग , । प्रियाप्रियांचे ।।192।।
यया आघवियांचाचि थोरु । एके वेळे आलिया पूरु , ।
तरी , अगस्त्य कां होऊनि धीरु । उभा ठाके ।।193।।
आकाशी धूमाची रेखा । उठिली बहुवा आगळिका , ।
तें गिळी येकीं झुळुका । वारा जेवी ।।194।।
तैसे , अधिभूताधिदैवां , । अध्यात्मादि उपद्रवां , ।
पातलेया , पांडवा ! । गिळूनि घाली ।।195।।

6 धैर्याच्या
7 वाईट
8 आत्मारुपी पतीच्या चिंतेंने 9 तोडून 10 समुदाय
11 काटेरी मार्ग
12 मन
13 सहनकरणाऱ्यामध्ये श्रेष्ठ 14 सहनशीलता
15 प्राक्तनकर्माने

ऐसे चित्तक्षोभाच्या अवसरी , । उचलूनि धैर्या जे चांगावे करी , ।
धृती म्हणिपे , अवधारी । तियेते गा ! ।।196।।
आतां , निर्वाळूनि कनके [1] । भरिला गांगेपीयुखे , । — 1 सोन्याचा
तया कलशाचियासारिखे । शौच असे ।।197।।
जे आंगी निष्काम आचारु , । जीवी , विवेकु साचारु , ।
तो , सबाह्य घडला आकारु । शुचित्वाचाचि ।।198।।
कां , फेडित पाप , ताप , । पोखीत तीरीचे पादप [2] । — 2 वृक्ष
समुद्रा जाय आप , । गंगेचे जैसे ।।199।।
कां , जगाचे आंध्य फेडितु , । श्रियेची राऊळे [3] उघडितु । — 3 लक्ष्मीचे निवासस्थान
निघे जैसा भास्वतु । प्रदक्षिणे ।।200।। — असलेली कमळे
तैसी , बांधिली सोडिता , । बुडाली काढिता , ।
सांकडी [4] फेडिता । आर्ताचिया ।।201।। — 4 अडथळे
किंबहुना , दिवसराती । पुढिलांचे सुख उन्नती ।
आणित , आणित , स्वार्थी । प्रवेशिजे [5] ।।202।। — 5 स्वहित चाहतो
वांचूनि , आपुलिये काजालागी , । प्राणिजाताच्या अहितभागी , ।
संकल्पाचीही आडवंगी [6] । न करणे जे ।।203।। — 6 कुमार्गाचा विचारहि न
पै , अद्रोहत्व ऐशिया गोष्टी । ऐकसि जिया , किरीटी ! । — करणे
तें सांगितले ,हे दिठी । पाहो ये , तैसे ।।204।।
आणि , गंगा शंभूचा माथा । पावोनि , संकोचे जेवी पार्था ! ।
तेवी , मान्यपणे सर्वथा । लाजणे जे ।।205।।
तें , हे पुढत , पुढती । अमानित्व जाण , सुमती ! ।
मागां सांगितलेसे , किती । तेचि तें बोलो ! ।।206।।
एवं , इही सव्विसे । ब्रह्मसंपदा हे वसत असे ।
मोक्षचक्रवर्तीचे जैसे । अग्रहार [7] होय ।।207।। — 7 ईनामी जमीन
नाना , हे संपत्ति दैवी । या गुणतीर्थाची नीच नवी ।
निर्विण्णसगरांची [8] , दैवी । गंगाचि आली ।।208।। — 8 विरक्त हेच कोणी सगर
की , गुणकुसुमांची माळा , । हे घेऊनि मुक्तिबाळा [9] । — राजे त्यांच्या 9 मुक्तिरुपी वधु
वैराग्यनिरपेक्षाचा गळा । गिवसीत असे [10] ।।209।। — 10 शोधत असते
की , सव्विसे गुणज्योती । इही उजळूनि आरती , ।
गीता , आत्मया निजपती [11] , । निरांजना [12] आली ।।210।। — 11 आत्मारुपी पतीला
उगळिते [13] निर्मळे । गुण , इयेचि मुक्ताफळे ,। — 12 ओवाळण्यास 13 बाहेर
दैवी शुक्तिकळे [14] । गीतार्णवाची ।।211।।211।। — टाकींत 14 शिंपल्याची
काय बहु वांनू ऐसी । अभिव्यक्ती [15] ये अपैसी । — शकले 15 प्रकटपणा
केली दैवी गुणराशी । संपत्तिरूप ।।212।।

आतां , दुःखाची आंतुवट [1] वेली ।दोषकाट्यांची जरी भरली , । 1 आंत दुःखाने भरलेली
तरी , निजाभिधानी घाली [2] । आसुरी ते ।।213।। 2 आपल्या सांगण्याचे
पै , त्याज्य त्यजावयालागी । जाणावी , जरी अनुपयोगी , । अनुशंगाने
तरी , ऐका , ते चांगी, । श्रोत्रशक्ती ।।214।।
तरी , नरकव्यथा थोरी , । आणावया दोषीघोरी ।
मेळू केला , ते आसुरी । संपत्ति हें ।।215।।
नाना , विषवर्गु एकवटु । तया नांव जैसा बासटु [3] । 3 कालकूट
आसुरी संपत्ति हा खोटु [4] । दोषांचा तैसा ।।21 6।। 4 गोळा

**दम्भो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ।**
**अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ।।4।।**

**दंभ,दर्प,अभिमान तसेच हें पार्था ! क्रोध, पारुष्य म्हणजे निष्ठूरपणा आणि अज्ञान, हे आसुरी म्हणजे राक्षसी संपत्तीत जन्मलेल्यास प्राप्त होतात.**

तरी , तयाचि असुरां । दोषांमाजी , जया वीरा ! ।
वाडपणाचा डांगोरा , । तो दंभु ऐसा ।।217।।
जैसी , अपुली जननी । नग्न दाविलिया जनी , ।
तें तीर्थचि , परी पतनी । कारण होय ।।218।।
कां , विद्या गुरुपदिष्टा [5] , । बोभाइलिया चोहटा , । 5 गुरुने उपदेशीलेली ब्रह्म
तरी इष्टदा [6] , परी अनिष्टा । हेंतु होती ।।219।। विद्या 6 चांगले फळ देणारी
पै , आंगे बुडतां महापूरी , । जे वेगे काढी पैलतीरी , ।
तें नावचि बांधिलिया शिरी , । बुडवी जैसी ।।220।।
कारण , जे जीविता , । ते वानिले जरी सेवितां , ।
तरी अन्नचि पंडुसुता ! । होय विष ।।221।।
तेसा, दृष्टादृष्टाचा सखा । धर्मु जाला,तो फोकारिजे[7] , देखा । 7 बडेजाव करणे
तरी तारिता , तोचि दोखा-। लागी होय ।।222।।
म्हणौनि , वाचेचा चौबारा [8] । घातलिया धर्माचा पसारा , । 8 चव्हाट्यावर
धर्मुचि , तो अधर्मु होय वीरा ! । तो दंभु जाणे ।।223।।
आतां , मूर्खाचिये जिभे । अक्षरांचा आंबुखा सुभे [9] । 9 शिंतोडा पडला
आणि , तो ब्रह्मसभे । न रिझे [10] जैसा , ।।224।। 10 आदर करीत नाही
कां,मादुरी[11] लोकांचा घोडा,। गजपतिही [12] मानी थोडा , । 11 तबेले ठेवणारे लोक
कां , कांटियेवरिल्या सरडा , । स्वर्गुही नीच ।।225।। 12 ऐरावत
तृणाचेनि इंधने , । आगी धांवे गगने , ।
थिल्लरबळे मीने , । न गणिजे सिंधू ।।226।।

तैसा , माजे स्त्रिया , धने , । विद्या , स्तुती , बहुतें माने ।
एके दिवसीचेनि पराज्ञे, । अल्पकु[1] जैसा ।।227।।    1 दरिद्री
अभ्रच्छायेचिया जोडी । निदैवु घर मोडी , ।
मृगांबु[2] देखोनि फोडी । पाणियाडे[3] , मूर्ख ।।228।।    2 मृगजळ 3 तळे
किंबहुना , ऐसैसे । उतणे जे संपत्तिमिसे , ।
तो दर्पु गा ! अनारिसे । न बोले घेई ।।229।।
आणि , जगा वेदी विश्वासु , । आणि , विश्वासी पूज्य ईशु , ।
जगी एक तेजसु । सूर्युचि हा ।।230।।
जगस्पृहे आस्पद[4] । एक सार्वभौमपद , ।    4 जगाच्या इच्छेचे स्थान
"न मरणे" निर्विवाद । जगा पढिये[5] ।। 231।।    5 आवडते
म्हणौनि , जग उत्साहे । याते वानूं जाये , ।
की, ते आइकोनि मत्सरु वाहे , । फुगो लागे ।।232।।
म्हणे , ईश्वराते खाये, । तया वेदा विष सूये , ।
गौरवामाजी त्राये[6] । भंगीत[7] असे ।।233।।    6 आपल्या महत्वाच्या योगाने
पतंगा नावडे ज्योती , । खद्योता भानूची खंती , ।    7 नष्ट करणे
टिटिभेने[8] आपांपती[9] । वैरी केला ।।234।।    8 टिटिवी 9 समुद्र
तैसा , अभिमानाचेनि मोहे , । ईश्वराचेही नाम न साहे , ।
बापाते म्हणे , मज हे । सवती[10] जाली ।।235।।    10 प्रतीस्पर्धी
ऐसा मान्यतेचा पुष्टगंडु[11] । तो अभिमानी परमलंडु[12] ।    11 मोठा ताठा 12 उन्मत्त
रौरवाचा रुढु[13] । मार्गुचि पै ।।236।।    13 नरकाचा निश्चित असा मार्ग
आणि , पुढिलाचे सुख । देखणियाचे होय मिख[14] , ।    14 निमित्त
चढे क्रोधाग्नीचे विख । मनोवृत्ती ।।237।।
शीतळाचिये भेटी , । तातला तेली आगी उठी[15] ।    15 तापलेले तेल खवळते
चंद्रु देखोनि जळे पोटी । कोल्हा जैसा ।।238।।
विश्वाचे आयुष्य जेणे उजळे,। तो सुर्यु उदैला देखोनि,सवळे[16] ।    16 पहाटे
पापिया फुटती डोळे । डुडुळाचे[17] ।।239।।    17 घुबडाचे
जगाची सुखपहांट , । चोरा मरणाहूनि निकृष्ट , ।
दुधाचे काळकूट । होय व्याळी[18] ।।240।।    18 साप
अगाधे समुद्रजळे । प्राशितां , अधिक जळे ।
वडवाग्नी , न मिळे । शांति कही ।।241।।
तैसा , विद्याविनोदविभवे[19] । देखे पुढिलांची दैवे , ।    19 विद्याविनोदादि ऐश्वर्य
तंव , तंव , रोषु दुणावे । क्रोधु तो जाण ।।242।।
आणि मन सर्पाची कुटी[20] , । डोळे नाराचांची सुटी[21] ।    20 वारूळ 21 बाणांचा वर्षाव
बोलणे तें वृष्टी , । इंगळांची[22] ।।243।।    22 निखारे

येर जे क्रियाजात , । ते तिखयाचे कर्वत [1] ।
ऐसे सबाह्य खसासित [2] । जयाचे गा ! ।।244।।
तो , मनुष्यांत अधमु जाण । पारुष्याचे अवतरण [3] ।
आतां , आइक खूण । अज्ञानाची ।।245।।
तरी शीतोष्णस्पर्शा , । निवाडु नेणे पाषाणु जैसा , ।
कां , रात्री आणि दिवसा । जात्यंधु तो ।।246।।
आगी उठिला , आरोगणे [4] । जैसा खाद्याखाद्य न म्हणे , ।
कां , परिसा पाडु नेणे [5] । सोनया , लोहा ।।247।।
नातरी , ते नानारसी । रिघोनि , दर्वी [6] जैसी ।
परी रसस्वादासी । चाखो नेणे ।।248।।
कां , वारा जैसा पारखी । नव्हेचि गा ! मार्गामार्गाविखी , ।
तैसे , कृत्याकृत्य विवेकीं । अंधपण जे ।।249।।
हें चोख , हे मैळ , । ऐसे नेणोनियां , बाळ ।
देखे ते केवळ , । मुखीचि घाली ।।250।।
तैसे , पापपुण्याचे खिचटे [7] । करोनि खातां , बुद्धिचेष्टे [8] ।
कडु , मधूर न वाटे । ऐसी जे दशा ।।251।।
तिये नाम अज्ञान । या बोला नाही आन ।
एवं , साही दोषांचे चिन्ह । सांगितले ।।252।।
**इहीच साही दोषांगी । हे आसुरी सपंत्ति दादुगी [9] ।**
**थोर विषय सुभगे अंगी [10] । अंग साने [11] ।।253।।**
कां,तिघा वन्हीच्या पांती [12] । पाहतां,थोडे ठाय गमती [13] , ।
परी , विश्वही प्राणाहुती । करूं न पुरे ।।254।।
धातयाही [14] गेलिया शरण , । त्रिदोषी न चुके मरण ।
तया तिहीची दुणी [15] जाण । साही दोष हे ।।255।।
इही साही दोषी संपूर्णी । जाली इयेची उभारणी ।
म्हणौनि , आसुरी उणी । संपदा नव्हे ।।256।।
परी , क्रूरग्रहांची जैसी । मांदी [16] , मिळे एकेचि राशी , ।
कां , येती निंदाकापासी । अशेष पापे ।।257।।
मरणाराचे आंग । पडिघाती [17] , अवघेचि रोग , ।
कां , क्रूमुहूर्ती दुर्योग । एकवटती ।।258।।
विश्वासला आतुडवीजें [18] चोरा,। शिणला सुइजें [19] महापुरा,।
तैसे दोषी इही नरा , । अनिष्ट कींजें ।।259।।
कां , आयुष्य जातिये वेळे , । शेळिये सातवेउळी [20] मिळे ।
तैसे साही दोष सगळे । जोडती तया ।।260।।

1 पोलादी कर्वत
2 खसखशीत
3 कठोरपणाचा अवतार
4 खावयाला
5 फरक करणे
6 पळी
7 खिचडी 8 बुद्धीव्यापाराला
9 बलवान
10 सुंदर स्त्रीच्या अंगी 11 लहान
12 प्रळयाग्नि,विद्युताग्नि व वडवाग्नि यांची पंगत 13 लहान आहेत वाटते 14 ब्रह्मदेवाला
15 दुप्पट
16 समुदाय
17 व्यापतात
18 विश्वास ठेवला असता लुबाडला जातो
19 शिणलेलेल्या घातले
20 सात डोक्यांची इंगळी

मोक्षमार्गाकडे । जै ययाचा आंबुखा [1] पडे , । 1 शिंतोडा
तै , न निघे , म्हणौनि बुडे , । संसारी जो ।।261।।
अधमां योनीच्या पाउटी [2] । उतरत जो किरीटी , । 2 पावलाने
स्थावरांही तळवटी । बैसणे घे ।।262।।
हें असो ; तयाच्या ठायी । मिळोनि साही दोषी इही , ।
आसुरी संपत्ति पाही । वाढविजे ।।263।।
ऐसिया या दोनी । संपदा प्रसिद्धा जनी ।
सांगितलिया चिन्ही । वेगळाल्या ।।264।।

**देवी संपद्विमोक्षाय निबन्धायासुरी मता ।**
**मा शुचः संपदं दैवीमभिजातोऽसि पांडव ।।5।।**
**यापैकीं दैवी संपत्ति परिणामी मोक्षदायक आणि आसुरी बंधदायक असे समजतात. हे पांडवा ! तूं दैवी संपत्तीत जन्मलेला आहेस. शोक करूं नको .**

इया दोन्हीमाजी पहिली । दैवी जे म्हणितली , ।
तें मोक्षसूर्ये पाहली । उखाचि [3] जाण ।।265।। 3 पहाट
येरी जे दुसरी । संपत्ति कां आसुरी , ।
तें मोहलोहाची खरी । सांखळी जीवां ।।266।।
परि , हे आइकोनि , झणे [4] ।भय घेसी हो मने । 4 कदाचित
काय रात्रीचा दिने । धाकु धरिजे ? ।।267।।
हें आसुरी संपत्ति , तया , । बंधालागी , धनंजया ! ।
जो साही दोषां ययां । आश्रयो होय ।।268।।
तूं तंव पांडवा ! । सांगितलेया ,दैवा ।
गुणनिधी बरवा , । जन्मलासी ।।269।।
म्हणौनि पार्था ! तूं या । देवी संपत्ती स्वामिया ।
होऊनि , यावे उवाया [5] । कैवल्याचिया [6]।।270।। 5 सुखाच्या 6 मोक्षाच्या

**द्वौ भूतसर्गो लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च ।**
**दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे श्रुणु ।।6।।**
**या लोकात दोन प्रकारचे प्राणी उत्पन्न होत असतात; एक दैव आणि दुसरा आसुर .पैकीं दैव प्रकाराचे वर्णन विस्ताराने सांगितले. आतां हें पार्था , आसुर प्रकाराचे वर्णन मी सांगतो, ऐक .**

आणि दैवां , आसुरां । संपत्तिवंतां नरां , ।
अनादिसिद्ध उजगरा [7] । राहाटीचा [8] आहे ।।271।। 7 मार्ग 8 आचरणाचा

जैसे , रात्रीच्या अवसरी , । व्यापारिजे निशाचरी , ।
दिवसा सुव्यवहारी । मनुष्यादिकीं ।।272।।
तैसिया , आपुलालिया राहाटी [1], । वर्तती दोन्ही सृष्टी । 1 प्रकारे
दैवी आणि , किरीटी ! । आसुरी येथ ।।273।।
तेवीचि विस्तारूनि दैवी , । ज्ञानकथनादि प्रस्तावी [2] । 2 प्रसंगी
मागील ग्रंथी बरवी । सांगितली ।।274।।
आतां , आसुरी जें सृष्टी , । तेथिची उपलऊ [3] गोठी । 3 उलगडून सांगतो
अवधानाची दिठी । दे पां ! निकीं ।।275।।
तरी , वाद्येवीण नादु । नेदी कवणाही सादु [4] । 4 प्रतिसाद
कां , अपुष्पी मकरंदु । न लभे जैसा ।।276।।
तैसी , प्रकृति हें आसुर । एकली नोहे गोचर [5] । 5 दिसत नाही
जंव एकाधे शरीर । माल्हातीना [6] ।।277।। 6 आश्रय करणे
मग,आविष्करला [7],लाकुडे ,। पावकु , जैसा जोडे [8],। 7 प्रकट झाला 8 व्यापून
तैसी , प्राणिदेही सांपडे ,। आटोपली [9] हे ।।278।। टाकतो 9 कब्जा घेतें
तें वेळी , जे वाढी ऊंसा , । तेचि आंतुला रसा , ।
देहाकारु होय तैसा । प्राणियांचा ।।279।।
आता , तयाचि प्राणिया । रूप करूं धनंजया ! ।
घडले जे आसुरीया । दोषवृंदी ।।280।।

**प्रवत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः ।**
**न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यतें ।।7।।**

**प्रवृत्ति म्हणजे काय करावें; आणि निवृत्ति म्हणजे काय करू नये. हे आसुर लोकांस कळत नसते; आणि शुचिर्भूतपणा किंवा आचार अगर सत्य ही त्यांचे ठायी वसत नसतात .**

तरी , पुण्यालागी प्रवृत्ती,। कां,पापाविषयी निवृत्ती । 10 हे जाणण्याविषयी मन
या जाणणेयाची राती [10] , । तयाचे मन ।।281।। अंधारात असते
निगणेया आणि प्रवेशा [11] , । चित्त नेदीतु , आवेशा । 11 बाहेर निघण्यास व प्रवेश
कोशकिटु जैसा , । जाचिन्नला पै ।।282।। करण्याचा मार्ग
कां , दिधले मागुतें येईल , । कीं न ये , हे पुढील ।
न पाहतां , दे भांडवल । मूर्ख , चोरां ।।283।।
तैसिया,प्रवृत्ति निवृत्ति दोनी । नेणिजती, आसुरी जनी ।
आणि , शौच तें स्वप्नी । देखती ना ते ।।284।।
काळिमा सांडील कोळसा,। वरी चोखी [12] होईल वायसा [13] । 12 पांढरा 13 कावळा
राक्षसही मांसा ।विटो शके ।।285।।

परी , आसुरां प्रणियां । शौच नाही धनंजया ! ।
पवित्रत्व जेवी भांडिया । मद्याचिया ।।286।।
वाढविती विधीची आस [1]। कां,पाहाती वडिलांची वास [2] । 1 इच्छा 2 मार्ग
आचाराची भाष , । नेणतीचि तें ।।287।।
जैसे चरणे शेळियेचे , । कां , धांवणे वारियाचे ।
जाळणे आगीचे । भलतेंउते ।।288।।
तैसे , पुढां सूनि स्वैर । आचरती , ते गा आसुर ।
सत्येसि कीर वैर । सदाचि तया ।।289।।
जरी नांगिया आपुलिया । विंचू करी गुदगुलिया , ।
तरी साचा बोली बोलिया । बोलती तें ।।290।।
अपानाचेनि तोंडे । जरी सुगंधा येणे घडे , ।
तरी सत्य तयां जोडे , । आसुरांते ।।291।।
ऐसे , ते न करितां कांही , । आंगेचि वोखटे [3] ,पाही । 3 स्वभावतःच वाईट असतात
आतां बोलती , ते नवाई । सांगिजैल ।।292।।
एऱ्हवी,करेयाच्या [4] ठायी,चांग ।ते,तयासि कैचे नीट आंग ?। 4 उंट
तैसा , आसुरांचा प्रसंग ; । प्रसंगे परिस ।।293।।
उधवणीचे [5] जेवी तोंड । उभळी धुंवाचे उभड [6] । 5 धुरांडे 6 लोट
हें जाणिजे तेवी , उघड । सांगो, ते बोल ।।294।।

**असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् ।**
**अपरस्परसंभूतं किमन्यत्कामहैतुकम् ।।8।।**

**आसुरी लोक सर्व जग असत्य, अ-प्रतिष्ठ म्हणजे निराधार, अनीश्वर म्हणजे परमेश्वरावाचून असणारे, अ-परस्परसंभूत म्हणजे एकमेकापासूनहि न झालेले, अतएव कामाखेरीज म्हणजे मनुष्याच्या विषयभोगा-खेरीज त्याचा दुसरा हेतु काय असणार, असे म्हणतात.**

तरी विश्व हा अनादि ठावो,। येथ नियंता [7] ईश्वररावो । 7 नियमन करणारा
चावडिये , न्यावो , अन्यावो , । निवडी वेदु ।।295।।
वेदी अन्यायी पडे , । तो निरयभोगें दंडे [8] । 8 नरकवासाची शिक्षा पावतो
सन्यायी [9] तो सुरवाडे [10]। स्वर्गी जिये ।।296।। 9 न्यायी 10 सुखाच्या
ऐसी हे विश्वव्यवस्था । अनादि जे पार्था ! ।
इयेतें म्हणती , ' ते वृथा । अवघेचि हे ' ।।297।।
यज्ञमूढ[11] ठकिले यागी[12] ,। देवपिसे [13], प्रतिमालिंगी । 11 मूर्ख याज्ञिक 12 यज्ञाने फसले
नागवले [14] , भगवे योगी । समाधिभ्रमे ।।298।। 13 देवभक्त 14 लुबाडले गेले
येथ , आपुलेनि बळे । भोगिजें जे , जे वेटाळे [15] । 15 कवटाळणे
हें वाचोनि वेगळे । पुण्य आहे ? ।।299।।

ना , अशक्तपणे आंगिके , । वेगळवेटाळी [1] न टके [2] ।
ऐसा गादिजेवीण [3] विषयसुखे [4] ,। तेचि पाप ।।300।।
प्राण घेपती संपन्नांचे , । ते , पाप जरी साचे ! ।
तरी,सर्वस्व हाता ये तयांचे,। हे पुण्यफळ कीं ! ।।301।।
बळी अबळाते खाय , । हेचि बाधित [5] जरी होय , ।
तरी मासयां कां न होय । निसंतान ? ।।302।।
आणि कुळे शोधूनि दोन्ही , । कुमारेचि शुभलग्नी ।
मेळवीजती , प्रजासाधनी । हेंतु जरी , ।।303।।
तरी , पशुपक्षादि जाती । जया मिती नाही संतती , ।
तयां , कोणे प्रतिपत्ती [6] ।विवाह केले ? ।।304।।
चोरियेचे धन आलें , । तरी ते कोणासि विष जाले ?।
वालभे [7] परद्वार केले , । कोढी [8] कोणी होय ? ।।305।।
म्हणौनि , देवो गोसांवी [9] , । तो धर्माधर्मु भोगवी , ।
आणि परत्राच्या गांवी । करी , तो भोगी ! ।।306।।
परी परत्र ,ना देवो । न दिसे , म्हणौनि ते वावो [10] ।
आणि कर्ता निमे [11] मा ठावो[12] ,। भोग्यासि [13] कवणु?।।307।।
येथ , उर्वशिया इंद्र सुखी । जैसा कां सवर्गलोकीं , ।
तैसाचि , कृमिही नरकीं । लोळतु श्लाघे [14] ।।308।।
म्हणौनि , नरक , स्वर्गु । नव्हे , पापपुण्यभागु , ।
जो दोही ठायी सुखभोगु । कामाचाचि तो ।।309।।
याकारणे , कामे । स्त्रिपुरुषयुग्मे ।
मिळती , तेथ जन्मे । आघवे जग ।।310।।
आणि , जे ,जे अभिलाषे [15] । स्वार्थालागी हे पोषे [16] ।
पाठी , परस्परद्वेषे , । कामचि नाशी ।।311।।
एवं , कामावाचूनि कांही । जगा मूळचि आन नाही , ।
ऐसे बोलती , पाही । आसुर गा ते ।।312।।
आता , असो हें किडाळ [17] । बोली न करूं पघळ ।
सांगताचि सफोल [18] । होतसे वाचा ।।313।।

1 वेगवेगळ्या गोष्टी एकत्र करणें
2 जमत नाही 3 चडफडणे
4 विषयसुखाकरिता
5 निषिद्ध कर्म
6 विधीवत
7 प्रेमाने 8 कोड असलेला
9 श्रेष्ठ
10 खोटे
11 मेल्यावर 12 अस्तित्व
13 भोगावयाचे कर्मफळ
14 आनंदाने
15 संतोष मानतो 16 मिळवतो
17 निंद्य
18 व्यर्थ

**एतां दृष्टिमवाष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः ।**
**प्रभवन्त्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः ।।9।।**

**अशा प्रकारची दृष्टि स्वीकारून अल्पबुद्धीचे हे नष्टात्मे व दुष्ट लोक कृर कर्मे आचरीत जगाचा क्षय करण्यास उत्पन्न होत असतात**

| | |
|---|---|
| आणि , ईश्वराचिया खंती [1] । नुसधियाचि करिती चांथी [2] । | 1 तिरस्कार 2 बडबड |
| हेंही नाही चित्ती । निश्चयो एकु ।।314।। | |
| किंबहुना , उघड । आंगी लाऊनियां पाखांड [3] । | 3 नास्तिकवाद |
| नास्तिकपणाचे हाड । रोविले जीवी ।।315।। | |
| तें वेळी , स्वर्गालागी आदरु , । कां नरकाचा अडदरु [4] । | 4 धाक |
| या वासनांचा अंकुरु । जळोनि गेला ।।316।। | |
| मग केवळ , ये देहखोडां । अमेध्योदकाचा [5] बुडबुडा । | 5 अपवित्र उदक |
| विषयपंकीं , सुहाडा ! । बुडाले गा ! ।।317।। | |
| जै आटावे [6] होती जळचर , । तै , डोही मिळती ढीवर [7] । | 6 मरण ओढवले असता |
| कां , पडावे होय शरीर , । तै , रोगा उदयो ।।318।। | 7 कोळी |
| उदैजणे केतूचे , जैसे । विश्वा अनिष्टोद्देशे , । | |
| जन्मती तें तैसे । लोका आटुं [8] ।।319।। | 8 क्षय करण्याकरता |
| विरूढलिया [9] अशुभ , । फुटती , तै , ते कोंभ । | 9 रुजले असता |
| पापाचे , कीर्तिस्तंभ । चालते ते ।।320।। | |
| आणि , मागांपुढां जाळणे । वाचूनि , आगी काही नेणे । | |
| तैसे , विरुद्धचि एक करणे । भलतेयां ।।321।। | |
| परी , तेचि गा करणे । आदरिती संभ्रमे जेणे [10] , । | 10 ज्या उत्साहाने आरंभ |
| तो , आइक पार्था ! म्हणे । श्रीनिवासु ।।322।। | करितात |

**काममाश्रित्य दुष्पूरं दम्भमानमदान्विता ः ।**
**मोहाद्गृहीत्वाऽसद्ग्राहान्प्रवर्तन्तेऽशुचिव्रताः।।10।।**

**आणि कधीच पुरा न होणाऱ्या कामाचा म्हणजे विषयोपभोगेच्छेचा आश्रय करून दंभ, मान व मद यांनी व्यापिलेले हे आसुरी लोक मोहाने खोटनाटे ग्रह म्हणजे भलत्या भलत्या कल्पना मनात धरून घाणेरडी कामे करण्यास प्रवृत्त होत असतात.**

| | |
|---|---|
| तरी , जाळ [11] पाणिये न भरे , । आगी इंधन न पुरे , । | 11 जाळे 12 तृप्त होण्यास |
| तयां दुर्भरांचिये धुरे [12] । भुकाळु [13] जो ।।323।। | कठीण असलेल्यामध्ये |
| तया कामाचा बोलावा । जीवी धरूनि पांडवा ! । | आघाडीचा 13 हपापलेला |
| दंभमानाचा मेळावा । मेळविती ।।324।। | |
| मातलिया कुंजरा [14] , । आगळी [15] जाली मदिरा , । | 14 हत्ती 15 जास्ती झाली |
| तैसा , मदाचा ताठा , तंव जरा [16] । चढतां आंगी , ।।325।। | 16 म्हातारपणातही |
| आणि,आग्रहा [17] तोचि ठावो । वरी मौढ्याऐसा सावावो [18] । | 17 हट्ट 18 मूर्खपणा |
| मग काय वानूं निर्वाहो [19] । निश्चयाचा ! ।।326।। | मदतीला 19 प्रकार |
| जिही परोपतापु घडे , । परावा जीवु रगडे , । | |
| तिही कर्मी होऊनि गाढे । जन्मवृत्ती ।।327।। | |

मग,आपुले केले फोकारिती [1] । आणि जगाते धिक्कारिती ।
दाही दिशी पसरिती । स्पृहाजाळ [2] ।।328।।
ऐसेनि गा आटोपे [3] , । थोरिये आणती पापे , ।
धर्मधेनु [4] खुरपे [5] । सुटले जैसे ।।329।।

1 गवगवा करतात
2 हावेचे जाळे
3 व्याप्त होऊन 4 धर्मार्थ सोडलेल्या गाईचे 5 चरणे हेच जणु हत्यार

**चिन्तामपरिमेयां च प्रलयान्तामुपाश्रिता ः ।**
**कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिता ः ।।11।।**

**तसेच आमरणान्त सुखोपभोगाच्या अगणित चिंतेंने ग्रासलेले, कामोपभोगात गढून गेलेले आणि तेच काय ते सर्वस्व असे निश्चयाने मानणारे**

याचि येका आयती [6] । तयाचिया कर्मप्रवृत्ती ।
आणि , जिणियाही परौती [7] । वाहती चिंता ।।330।।
पाताळाहूनि निम्न [8]। जियेचिये उंचीये , साने गगन ।
जे पाहातां , त्रिभुवन । अणुही नोहे ।।331।।
तें योगपटाची मवणी [9] । जीवी , अनियम [10] चिंतवणी ।
जे सांडुं नेणे मरणी । वल्लभा जैसी ।।332।।
तैसी , चिंता अपार । वाढविती निरंतर , ।
जीवी सूनि [11] असार । विषयादिक ।।333।।
स्त्रिया गाइले आइकावे , । स्त्रीरूप डोळां देखावे , ।
सर्वेंद्रिये आलिंगावे । स्त्रियेतेचि ।।334।।
कुरवंडी कीजें [12] अमृते , । ऐसे सुख स्त्रियेपरौतें ।
नाहीचि , म्हणौनि चित्ते । निश्चयो केला ।।335।।
मग , तयाचि स्त्री भोगा-। लागी , पाताळ , स्वर्गा ।
धावती , दिग्विभागा । परौतेही [13]।। 336।।

6 सामग्री
7 जगण्याच्या पलिकडील
8 खोल
9 जणु काय नवीन संन्यास्याने नियम घोकावेत अशाप्रकारे
10 सतत
11 घालून
12 ओवाळून टाकतो
13 दिशांचे पलिकडेही

**आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ।**
**ईहन्ते कामभोगार्थमन्यायेनार्थसंचयान् ।।12।।**

**शेकडो आशापाशांनी बद्ध झालेले, कामक्रोधपरायण होत्साते हें आसुरी लोक सुखोपभोगार्थ अन्यायाने पुष्कळ अर्थ संचय करण्याची हांव बाळगीत असतात.**

आमिषकवळु [14] थोरी आशा,। न विचारितां, गिळी मासा ।
तैसे , कीजे विषयाशा । तयांसि गा ! ।।337।।
वांछित तंव न पवति , । मग कोरडियेचि आशेची संतती ।
वाढऊं , वाढऊं , होती । कोशकिडे ।।338।।

14 अमीषाचा घास

आणि , पसरिला अभिलाषु । अपूर्ण होय , तोचि द्वेषु ।
एवं , कामक्रोधांहूनि अधिकु । पुरुषार्थु नाही ।।339।।
दिहा खोलणे [1] ,रात्री जागोवा,। ठाणांतरियां जैसा , पांडवा ! । 1 पुढे चालणे 2 पहारेकरी
अहोरात्रीही विसावां । भेटेचिना ।।340।।
तैसे , उंचौनि लोटिले कामे , । नेहटती [3] क्रोधाचिये ढेमे [4] । 3 आदळतात 4 खडकावर
तरी , रागद्वेष , प्रेमे ,। न माती केही [5] ।।341।। 5 कुठेहि मावत नाही
तेवीचि , जीवीचिया हांवा , । विषयवासनांचा मेळावा ।
केला , तरी भोगावा । अर्थे कीं ना ? ।।342।।
म्हणौनि , भोगावयाजोगा । पुरता अर्थु , पै , गा ! ।
आणावया , जगा । झोंबती सैरा ।।343।।
एकाते साधूनि मारिती , । एकाचि सर्वस्वे हरिती , ।
एकालागी उभारिती । अपाययंत्रे ।।344।।
पाशिके [6] ,पोती,वांगुरा [7] । सुणी [8] , ससाणे [9] ,चिकाटी [10] खोचारा [11] । 6 फास 7 जाळी
घेऊनि , निघती डोंगरा । पारधी जैसे ।।345।। 8 कुत्री 9 ससाण पक्षी
तें पोसावया पोट , । मारूनि प्राणियांचे संघाट । 10 चिकट काठी 11 भाले
आणिती , ऐसे निकृष्ट । तेही करिती ।।346।।
परप्राणघाते । मेळविती वित्ते ।
मिळाल्या, चित्ते । तोषणे कैसे ? ।।347।।

**इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् ।**
**इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ।।13।।**
**मी आज हे मिळविले, उद्या तो मनोरथ प्राप्त करीन ; हे धन मजजवळ आहे , आणि पुनः तेहि माझे होईल;**

म्हणे , '' आजि मियां । संपत्ति बहुतेकांचिया ।
आपुल्या हाती केलिया । धन्यु ना मी ! '' ।।348।।
ऐसा श्लाघो [12] जंव जाये । तंव , मन आणीकही वाहे , । 12 हुरळून जाऊन
सवेचि म्हणे , '' पाहे । आणिकाचेही आणूं ।।349।।
हें जेतुले असे जोडिले , । तयाचेनि भांडवले ।
लाभा , घेईन उरले । चराचर हे ।।350।।
ऐसेनि , धना विश्वाचिया । मीचि होईन स्वामिया , '' ।
मन , दिठी पडे ,तया । उरो नेदी ।।351।।

**असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि ।**
**ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धो ऽहं बलवान्सुखी ।।14।।**
**हा शत्रु मी मारिला, आणि दुसरेहि मारीन; मी ईश्वर, मीच उपभोग घेणारा, मी सिद्ध, बलाढय आणि सुखी .**

हें मारिले वैरी थोडे , । आणीकही साधीन गाढे [1] , ।
मग नांदेन पवाडे [2] । येकलाचि मी ।।352।।
मग , माझी होतील कामारी [3] । तियेवांचूनि , येरे मारी ।
किंबहुना , चराचरी । ईश्वरु तो मी ।।353।।
मी भोगभूमीचा रावो । आजि स्वर्गसुखासी ठावो [4] ।
म्हणौनि , इंद्रुही वावो [5] । मातें पाहूनि ।।354।।
मी मने , वाचा , देहे । करी , ते कैसे नोहे ? ।
के मजवांचूनि आहे । आज्ञासिद्ध [6] आन ? ।।355।।
तंवचि , बळिया काळु [7] , । जंव , न दिसे मी अतुर्बळु [8] ।
सुखाचा कीर निखिळु [9] । रासिवा मीचि ।।356 ।।

1 अधीक बलवान
2 समर्थपणे
3 दास
4 आश्रयस्थान
5 व्यर्थ
6 ज्याची आज्ञा सर्वत्र पाळली जाते असा 7 काळ 8 बिनजोड
9 एकमात्र

**आढ्योऽभिजनवानस्मी कोऽन्योस्ति सदृशो मया ।**
**यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिता : ।।15।।**

**मी संपन्न व कुलवान्,माझ्यासारखा दुसरा आहे कोण ? मी यज्ञ करीन, मी दान देईन, मी चैन करीन, याप्रमाणे अज्ञानाने मोह पावलेले**

कुबेरु आथिला [10] होये , । परी , तो नेणे माझी सोये [11] ।
संपत्ती मजसम नव्हे । श्रीनाथाही ।।357।।
माझिया कुळाचा उजाळू , । का जातिगोतांचा मेळू ।
पाहतां , ब्रह्माही हळु [12] । उणाचि दिसे ! ।।358।।
म्हणौनि , मिरविती नांवे । वायां , ईश्वरादि आघवे ।
नाही मजसी सरी [13] पावे । ऐसे कोण्ही ।।359।।
आतां , लोपला अभिचारु [14] । तया करीन मी जीर्णोद्धारु ।
प्रतिष्ठीन परमारु [15] । यागवरी ।।360।।
मातें गाती , वानिती , । नटनाचे रिझविती , ।
तया देईन मागती । तें , ते , वस्तु ।।361।।
माजिरा [16] अन्नपानी , । प्रमदांच्या आलिंगनी , ।
मी होईन त्रिभुवनी । आनंदाकारु ।।362।।
काय बहु सांगो ! ऐसे । तें आसुरीप्रकृती , पिसे [17] ।
तुरंबिती असोसे [18] । गगनौळे [19] तिये ।।363।।

10 संपन्न 11 योग्यता
12 थोडासा
13 बरोबरी करील असा
14 जारणमारण क्रिया
15 दुसऱ्याचा नाश करणारे
16 मादक
17 भ्रमलेपणाने
18 हांवरेपणाने स्वाद घेतात
19 खपुष्पाचा

**अनेकचित्तविभ्रान्ता मोहजालसमावृताः ।**
**प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरके ऽशुचौ ।।16।।**
**अनेक प्रकारच्या कल्पनांनी भ्रमलेले, मोहाच्या जाळ्यात गुरफटलेले, आणि विषयोपभोगात आसक्त झालेले हें आसुरी लोक घाणेरड्या नरकात पडतात**

ज्वराचेनि आटोपे , । रोगी भलतैसे जल्पे ।
चावळती [1] संकल्पे , । जाण ते तैसे ।।364।। 1 बडबडतात
अज्ञान आतुले धुळी [2] । म्हणौनि , आशा वाहटुळी । 2 आतल्या अज्ञानरुपी धुळीमुळे
भोवंडीजती अंतराळी । मनोरथांच्या ।।365।।
अनियम आषाढ मेघ , । कां , समुद्रोर्मी [3] अभंग [4] । 3 समुद्राच्या लाटा 4 अखंड
तैसे , कामिती अनेग , । अखंड , काम ।।366।।
मग पै , कामनाचि तया । जिवी जाल्या वेलरिया [4] । 4 वेलींचे जाळे
वोरपिली [5] कांटिया । कमळे जैसी , ।।367।। 5 ओरबाडून काढणे
कां , पाषाणाचिया माथां । हांडी फुटली पार्था ! ।
जीवी तैसे सर्वथा । कुटके [6] जाले ।।368।। 6 तुकडे
तेव्हां , चढतिये रजनी । तमाची होय पुरवणी , ।
तैसा , मोहो अंतःकरणी । वाढोचि लागे ।।369।।
आणि , वाढे जंव , जंव मोहो , । तंव , तंव विषयी रोहो [7] । 7 दृढता
विषय तेथ ठावो । पातकासी ।।370।।
पापे आपलेनि थांवे [8] । जंव करिती मेळावे , । 8 बळाने
तंव , जितांचि आघवे । येती नरकां ।।371।।
म्हणौनि गा सुमती ! । जे कुमनोरथां पाळिती , ।
तें आसुर येती वस्ती । तया ठाया , ।।372।।
जेथ , असिपत्रतरुवर [9] , । खदिरांगाराचे [10] डोंगर, । 9 झाडांची पाने तरवारीसारखी
तातला तेली सागर [11] । उतताती [12] ।।373।। 10 निखाऱ्याचे 11 तप्त तेलाचे समुद्र
जेथ यातनांची श्रेणी , । हे नित्य नवी यमजाचणी । 12 उकळत असतात
पडती तिये दारुणी । नरकलोकीं ।।374।।
ऐसे नरकाचिये शेले । भागी [13] , जे , जे जन्मले , । 13 वेचक
तेही देखो , भुलले । यजिती यागी ।।+375।।
एऱ्हवी , यागादिक क्रिया । आहाण [14] ,तेचि, धनंजया । 14 आत्मघातक होतात
परी विफळती , आचरोनियां । नाटकीं जैसी ।।376।।
वल्लभाचिया उजरिया [15] । आपणयाप्रति , कुस्त्रिया । 15 प्रियकराचा आश्रय करून
जोडोनि , तोषिती जैसिया , । अहेवपणे ।।377।।

**आत्मसंभाविताः स्तब्धा धनमानमदान्विता ः ।**
**यजन्ते नामयज्ञैस्ते दंभेनाविधिपूर्वकम् ।।17।।**
**आत्मश्लाघी, ताठ्याने वागणारे, व धन आणि मान यांच्या मदाने युक्त असलेले हें आसुरी लोक दांभिकपणाने शास्त्रविधि सोडून देऊन केवळ नांवाचे यज्ञ करीत असतात.**

तैसे , आपणयां आपण । मानितां महंतपण , ।
फुगती असाधारण । गर्वे तेणे ।।378।।
मग लवों नेणती कैसे ! । आटिवा [1] लोहाचे खांब जैसे । 1 ओतीव
कां , उधवले [2] आकाशे । शिळाराशी [3]।।379।। 2 उंच गेले 3 पर्वत
तैसे , आपुलिये बरवे [4] , । आपणचि रिझता [5] जीवे । 4 ऐश्वर्याने 5 संतुष्ट होऊन
तृणाहीहून आघवे । मानिती नीच ।।380।।
वरी धनाचिया मदिरा । माजूनि , धनुर्धरा ! ।
कृत्याकृत्यविचारा । सवते [6] केले ।।381।। 6 सोडून वेगळे केले
जया आंगी आयती [7] ऐसी , । तेथ यज्ञाची गोठी कायसी ! । 7 सामग्री
तरी काय , काय पिसी [8]। न करिती गा ! ।।382।। 8 भ्रमलेपणाने
म्हणौनि , कोणे एके वेळे , । मौढ्यमद्याचेनि बळे , ।
यागाचीही टवाळे [9] । आदरिती ।।383।। 9 नाटके
ना कुंड , मंडप ,वेदी , । ना उचित साधनसमृद्धी , ।
आणि , तयांसी तंव विधी । द्वंद्वचि [10] सदा ।।384।। 10 वैमनस्य
देवां ,ब्रह्मणांचेनि नांवे , । आडवारेनहि [11] नोहावे ! । 11 कानावर पडु देत नाहीत
ऐसे आथी , तेथ यावे । लागे कवणा ? ।।385।।
पै , वासरुवाच भोकसा [12] । गाईपुढे ठेवूनि जैसा । 12 पेंढा भरलेले वासरु
उगाणा घेती [13] क्षीररसा । बुद्धिवंत ।।386।। 13 पिळून काढतात
तैसे , यागाचेनि नांवे । जग वाऊनि [14] हांवे , । 14 बोलाऊन
नागविती आघवे । अहेरावारी ।।387।।
ऐशा कांही आपुलिया । होमिती [15] जे उजरिया [16] । 15 होम करिता 16 उत्कर्षासाठी
तेंणे कामिती प्राणिया । सर्वनाशु ।।388।।

**अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः ।**
**मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयकाः ।।18।।**
**अहंकाराने, बलाने, दर्पाने , कामाने व क्रोधाने फुगुन जाऊन आपल्या स्वतःच्या व इतरांच्या देहांत असणारा जो मी परमेश्वर त्याचा द्वेष करणारे आणि निंदक**

मग , पुढा भेरी , निशाण । लाऊनि , ते दीक्षितपण ।
जगी फोकारिती आण । वावो वावो [17] ।।389।। 17 उगाचच

| | |
|---|---|
| तेव्हां , महत्त्वे तेणे अधमा ।गर्वा चढे महिमा [1] । | 1 मोठेपणा |
| जैसे लेवे [2] दिधले तमा । काजळाचे ।।390।। | 2 लेप दिला |
| तैसे , मौढ्य घणावे , । औद्धत्य उंचावे , । | |
| अहंकारु दुणावे । अविवेकुही ।।391।। | |
| मग दुजयाची भाष । नुरवावया निःशेष , । | |
| बळियेपणा अधिक । होय बळ ।।392।। | |
| ऐसा , अहंकार बळा । जालिया एकवळा [3] , । | 3 एकजुट |
| दर्पसागरु मर्यादवेळा । सांडूनि उते [4] ।।393।। | 4 उतु जातो |
| मग , वोसंडिलेनि दर्पे , । कामाही पित्त कुरुपे [5] । | 5 पित्त प्रकोप होतो |
| तया धगी , सैंध पळिपे [6] । क्रोधाग्नि तो ।।394।। | 6 जोरात पेटतो |
| तेंथ उन्हाळा , आगी , खरमरा। तेलातुपाचिया कोठारा । | |
| लागला , आणि वारा । सुटला जैसा ।। 395।। | |
| तैसा अहंकारु बळा आला । दर्पु कामक्रोधी गूढला , । | |
| या दोहीचा मेळु जाला । जयाच्या ठायी , ।।396।। | |
| तें आपुलिया सवेशा [7] । मग कोणी कोणी हिंसा । | 7 इच्छेप्रमाणे |
| या प्राणियाते वीरेशा ! । न साधती गा ! ।।397।। | |
| पहिले तंव धनुर्धरा ! । आपुलिया मांसरुधिरा । | |
| वेचु [8] करिती अभिचारा-। लागोनियां [9] ।।398।। | 8 खर्च करितात |
| तेंथ जाळिती जिये देहे , । यामाजी जो मी आहे , | 9 जारणमारण विधीकरिता |
| तया आत्मया मज घाये । वाजती [10] तें ।।399।। | 10 घाव बसतात |
| आणि , अभिचारकीं तिही । उपद्रविजे जेतुले काही । | |
| तेंथ , चैतन्य मी , पाही , । सीणु पावे [11] ।।400।। | 11 कष्टी होतो |
| आणि अभिचारावेगळे । विपाये जे अवगळे [12] । | 12 चुकुन जे राहते |
| तया टाकिती इटाळे [13] । पैशुन्याची [14] ।।+401।। | 13 दगड 14 दोषदृष्टिने |
| सती आणि सत्पुरुख , । दानशीळ याज्ञिक , । | |
| तपस्वी अलौकिक , । सन्यासी जे , ।।402।। | |
| कां , भक्त , हन , महात्मे । इये माझी निजाची धामे । | |
| निर्वाळली होमधर्मे । श्रौतादिकीं , ।।403।। | |
| तयां द्वेषाचेनि काळकूटे । बासटोनि [15] तिखटे [16] । | 15 चोपडून 16 तिखट |
| कुबोलाची सदटे [17] । सूति कांडे [18] ।।404।। | 17 बळकट 18 मारतात |

**तानहं द्विषतः क्रुरान्संसारेषु नराधमान् ।**
**क्षिपाम्यजस्त्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ।।19।।**

**अशुभ कर्मे करणाऱ्या या द्वेष्ट्या व क्रूर नराधमांस या संसारातील आसुरी म्हणजेच पापयोनीतच मी नेहमी टाकींत असतो**

ऐसे आघवाचि परी । प्रवर्तले माझ्या वैरी [1] , ।
1 माझ्याशी वैर करण्यास प्रवृत्त झाले
तयां पापिया जे मी करी । तें आइक पां ! ।।405।।
तरी मनुष्यदेहाचा तागा [2] । घेऊनि , रुसती जे जगा , ।
2 आश्रय घेऊन
तें पदवी हिरोनि पै गा ! । ऐसे ठेवी , ।।406।।
जे क्लेशगांवीचा उकरडा , । भवपुरीचा पानवडा [3] ।
3 गावातील घाण पाणी सोडण्याची जागा
तें तमोयोनि तयां मूढां । वृत्तीचि दे ।।407।।
मग आहाराचेनि नांवे , । तृणही जेंथ नुगवे , ।
तें व्याघ्र ,वृश्चिक ,आडवे [4] । तैसिये करी ।।408।।
4 अरण्यात
तेंथ क्षुधादुःखे बहुतें , । तोडूनि खाती आपणयाते ।
मरमरो मागुतें । होतचि असती ।।409।।
कां , आपुला गरळजाळी [5] । जाळिती आंगाची पेंदळी [6] ।
5 विषाग्नित 6 वेटोळी
तें सर्पचि करी , बिळी । निरुंधला [7] ।।410।।
7 कोंडलेला
परी घेतला श्वासु घापे । येतुलेनही मापे ।
विसांवा तयां नाटोपे । दुर्जनासी ।।411।।
ऐसेनि कल्पांचिया कोडी , । गणितांही संख्या थोडी , ।
तेंतुला वेळु न काढी । क्लेशौनि तयां ।।412।।
तरी तयांसी जेथ जाणे , । तेथिंचे हे पहिले पेणे [8] ।
8 मुक्काम
तें पावोनि येरे दारुणे । न होती दुःखे ?।।413।।

**आसुरी योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि ।**
**मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम् ।।20।।**
**हें कौंतेंया याप्रमाणे जन्मोजन्म आसुरी योनीच प्राप्त होऊन, हे मूर्ख लोक माझ्याकडे कधीच न येतां, अखेर अत्यंत अधोगतीला जातात.**

हा ठायवरी [9] , । संपत्ति तें आसुरी ।
9 येथपर्यंत
अधोगती , अवधारी , । जोडिली तिही ।।414।।
पाठी व्याघ्रादि,तामसा ।योनी,तो अळुमाळु[10] ऐसा ।
10 थोडासा
देहाधाराचा उसासा [11] । आथी जोही , ।।415।।
11 ओलावा
तोही मी वोल्हावा हिरे , । मग तमचि होती एकसरे ।
जेथ गेले , आंधारे । काळवंडैजे ।।416।।
जयांची पापा चिळसी [12] , । नरक घेती विवसी [13] ।
12 कीळस 13 घाबरतो
शीण जाय मूर्च्छी । सिणे जेणे ।।417।।
मळु जेणे मैळे , । तापु जेणे पोळे , ।
जयाचेनि नांवे सळे [14] । महाभय ।।418।।
14 घाबरते

पापा जयाचा कंटाळा , । उपजे अमंगळ , अमंगळा , ।
विटाळुही विटाळा । बिहे जया , ।।419।।
ऐसे विश्वाचेया वोखटेंया । अधम [1] जे धनंजया ! । 1 अधमातले अधम
ते , ते होती भोगूनिया । तामसा योनी ।।420।।
अहा ! सांगतां वाचा रडे , । आठवितां मन खिरडे [2] । 2 मागे सरते
कटारे [3] ! मूर्खी केवढे । जोडिले निरय [4] ? ।।421।। 3 हाय ! हाय ! 4 नरक
कायिसया ते आसूर । संपत्ति पोषिती वाउर [5] । 5 वाईट
जिया दिधले घोर । पतन ऐसे ? ।।422।।
म्हणौनि तुवां धनुर्धरा ! । नोहावे गा तिया मोहरा [6] , । 6 मार्गाला
जेउता [7] वासु [8] आसुरा । संपत्तिवंता ।।423।। 7 जेथे 8 राहतात
आणि , दंभादि दोष साही । हे संपूर्ण जयांच्या ठायी ।
तें त्यजावे हे काई । म्हणो कीर ! ।।424।।

**त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।**
**कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ।।21।।**
**काम , क्रोध व लोभ असे तीन प्रकारचे नरकाचे द्वार असून ते आपला नाश करणारे आहे .**
**म्हणून या तिहीचाहि त्याग करावा .**

परी काम , क्रोध , लोभ । या तिहीचेही थोंब [9] । 9 प्रस्थ
थांवे [10] , तेथ अशुभ । पिकले जाण ।।425।। 10 माजते
सर्व दुःखा आपुलिया । दर्शना , धनंजया ! ।
पाढाऊ [11] हे भलतया । दिधले आहाती ।।426।। 11 वाटाडे
कां , पापिया नरकभोगी । सुवावयालागी , जगी ।
पातकांची दाटुगी [12] । सभाचि हे ।।427।। 12 पराक्रमी
तें रौरव [13] गा ! तंवचिवरी । आइकिजती, पटांतरी [14] । 13 महानरक 14 परोक्ष रीतेंने
जंव हें तिन्ही अंतरी । उठती ना ।।+428।।
अपाय तिही आसलग [15] । यातना इही सवंग [16] । 15 सोप्या 16 सुलभ
हाणी हाणी [17] नोहे ! हे तिघ । हेचि हाणी ।।429।। 17 मारामारी नाही
काय बहु बोलो सुभटा ! । सांगितलिया निकृष्टा ।
नरकाचा दारवंटा [18] । त्रिशंकु [19] हा ।।430।। 18 उंबरठा 19 तीन खीळे
या कामक्रोधलोभा-। माजी , जीवे जो होय उभा , । मारलेला
तो निरयपुरीची [20] सभा । सन्मानु पावे ।।431।। 20 नरकाची
म्हणौनि , पुढत पुढती किरीटी ! । हे कामादि दोष त्रिपुटी ।
त्यजावीचि गा ! वोखटी [21] । आघवा विषयी ।। 432।। 21 वाईट

**एतैर्विमुक्तः कौन्तेंय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः ।**
**आाचारत्यान्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम् ।।22।।**
**हें कौंतेंया! या तीन तमोद्वारांतून सुटला म्हणजें मनुष्य आपले ज्यात कल्याण तेच आचरण करु लागतो , व नंतर उत्तम गतीला पोचतो**

धर्मादिकां चौही आंतु । पुरुषार्थाची तैचि मातु [1] ।
करावी , जै संघातु । सांडील हा ।।433।।
हें तिन्ही जीवी जंव जागती,।तंववरी,” निकियाची [2] प्राप्ती,”।
हें माझे कान नाइकती । देवोही म्हणे ।।434।।
जया आपणपें पढिये [3] , । आत्मनाशा जो बिहे , ।
तेणे न धरावी हे सोये [4] । सावधु होइजें ।।435।।
पोटी बांधोनि पाषाण । समुद्री बाही आंगवण [5] ।
कां , जियावया जेवण । काळकूटाचे ।।436।।
इही कामक्रोधलोभेसी । कार्यसिद्धि जाण तैसी , ।
म्हणैनि , ठावोचि पुसी [6] । ययांचा गा ! ।।437।।
जै कही अवचटे । हें तिकडी [7] सांखळ तुटे , ।
तै , सुखे आपुलिये वाटे । चालो लाभे ।।438।।
त्रिदोषी सांडिले शरीर , । त्रिकुटी [8] फिटलिया नगर , ।
त्रिदाह [9] निमालिया , अंतर । जैसे होय ।।439।।
तैसा , कामादिकीं तिघी । सांडिला , सुख पावोनि , जगी ।
संगु लाहे [10] मोक्षमार्गी । सज्जनांचा ।।440।।
मग सत्संगे प्रबळे , । सच्छास्त्राचेनि बळे , ।
जन्ममृत्यूची निमाळे [11] । निस्तरे [12] राने ।।441।।
तें वेळी आत्मानंदे आघवे । जे सदा वसते बरवे ।
तें तैसेचि पाटण [13] पावे । गुरुक्रुपेचे ।।442।।
तेंथ प्रियाची परमसीमा । तो भेटे माउली आत्मा ।
तये खेवी आटे डिंडिमा [14] । संसारिक हे ।।443।।
ऐसा जो कामक्रधलोभां । झाडी करूनि ठाके उभा , ।
तोचि येवढिया लाभा । गोसावी [15] होय ।।444।।

1 गोष्ट
2 चांगल्याची
3 आवडतो
4 मार्ग
5 बाहुबळाने समुद्र तरून जाणे
6 समूळ नष्ट कर
7 तीन कड्यांची
8 चाहडी,चोरी व शिंदळकीं
9 आध्यात्मिक, अधिदैविक व अधिभौतिक
10 प्राप्त होतो
11 बरड जमीन 12 पार पाडतो
13 नगर
14 गलबला
15 धनी

**यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।**
**न स सिद्धिमवाप्नोनि न सुखं न परां गतिम् ।।23।।**
**जो शास्त्रोक्त विधि सोडून मनास वाटेल ते करूं लागला, त्याला सिद्धि मिळत नाही, सुख नाही आणि उत्तम गतीही नाही .**

ना , हे नावडोनि कांही , । कामादिकांच्याचि ठायी ।
दाटिली [1] जेणे डोई , ।आत्मचोरे [2] ।।445।। 1 डोके घातले 2 आत्मघातक्याने
जो जगी समान सकृपु , । हिताहित दाविता दीपु , ।
तो अमान्यु केला बापु । वेदु जेणे ।।446।।
न धरीचि विधीची भीड , । न करीचि आपली चाड [3] , । 3 आत्मप्राप्तीची इच्छा
वाढवीत गेला कोड । इंद्रियांचे ।।447।।
कामक्रोधलोभांची कास । न सोडीच , पाळिली भाष [4] ,। 4 शपथ
स्वैराचाराचे असोस [5] । वळघला [6] रान ।।448।। 5 मोठे 6 आश्रय केला
तो , सुटकेचिया वाहिणी [7] । मग पिवो न लाहे पाणी । 7 ओघ
स्वप्नीही तें काहाणी । दूरीचि तया ।।449।।
आणि , परत्र तंव जाये , । हे कीर तया आहे , ।
परी , ऐहिकही न लाहे । भोग भोगुं ।।450।।
तरी , माशालागी भुलला , । ब्राह्मण पणबुडां [8] रिघाला । 8 कोळ्यांच्या जातीत
कीं , तेथही पावला , । नास्तिकवादु [9] ।।451।। 9 भ्रष्ट नास्तीक म्हणून
तैसे , विषयांचेनि कोडे , । जेणे परत्रा केले उबडे [10] , । झिडकारले 10 घालवले
तंव तोचि आणिकींकडे । मरणे नेला ।।452।।
एवं , परत्र ना स्वर्गु , । ना ऐहिकही विषयभोगु , ।
तेंथ केउता प्रसंगु । मोक्षाचा तो ? ।।453।।
म्हणोनि,कामाचेनि बळे,। जो विषय सेवूं पाहे सळे [11],। 11 हट्टाने
तया विषयो , ना , स्वर्गु मिळे , । ना उद्धरे तो ।।454।।

**तस्माच्छास्त्रं प्रमाणं तें कार्याकार्यव्यवस्थितौ ।**
**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ।।24।।**

**तस्मात् कार्याकार्यव्यवस्थितीचा म्हणजे कर्तव्य कोणते व अकर्तव्य कोणते याचा निर्णय करण्यास तुला शास्त्र प्रमाण मानिले पाहिजे; व शास्त्रांत काय सांगितले आहे ते समजून घेऊन त्याप्रमाणे या लोकीं कर्म करणे तुला योग्य होय.**

या कारणे , पै , बापा ! । जया आथी आपुली कृपा , ।
तेंणे वेदांचिया निरोपा [12] । आन [13] न कींजे ।।455।। 12 आज्ञेहून 13 वेगळे
पतीचिया मता (व्रता) । अनुसरोनि , पतिव्रता ।
अनायासे आत्महिता । भेटेचि तें।।456।।
नातरी , श्रीगुरुवचना । दिठी देंतु जतना [14] , । 14 पाळण्याकरिता दृष्टि
शिष्य , आत्मभुवना- । माजी पैसे [15] ।।457।। ठेवून 15 प्राप्त करितो

हें असो ; आपुला ठेवा। हाता आथी जरी यावा , ।
तरी आदरे [1] जेवी दिवा । पुढा कींजे ।।457।। 1 आगत्याने
तैसा,अशेषांही पुरुषार्था,। जो गोसावी [16] हो म्हणे पार्था ! । 2 धनी
तेंणे , श्रुतिस्मृति माथां । बैसणे घापे [3] ।।459।। 3 घालावे
शास्त्र म्हणेल जे सांडावे , । ते , राज्यही तृण मानावे ।
जे घेववी , ते न म्हणावे । विषही विरु [4] ।।460।। 4 मारक
ऐसिया वेदैकनिष्ठा । जालिया जरी सुभटा ! ।
तरी के आहे अनिष्टा । भेटणे गा ? ।।461।।
पै , अहितापासूनि काढिती , । हित देऊनि वाढविती , ।
नाही गा श्रुतिपरौती । माऊली जगा ! ।।462।।
म्हणौनि , ब्रह्मेशी मेळवी । तंव , हे कोणे न सांडावी ।
अगा ! तुवाही ऐसीचि भजावी । विशेषेसी ।।463।।
जे आजि अर्जुना ! तूं येथे । करावया सत्य शास्त्रे सार्थे [5] । 5 याथार्थ
जन्मलासि , बळार्थे । धर्माचेनि [6] ।।464।। 6 पूर्वपुण्याईचे जोराने
आणि , धर्मानुज , हे ऐसे । ओघेचि आलें अपैसे ।
म्हणौनि , अनारिसे [7] । करूं नये ।।465।। 7 अधर्म
कार्याकार्यविवेकीं । शास्त्रेचि करावी पारखी [8] । 8 पारखून घ्यावी
अकृत्य ते कुडे [9] लोकीं । वाळावे गा ! ।।466।। 9 वाईट
मग , कृत्यपणे खरे निगे, । ते तुवां आपुलेनि आंगे ।
आचरोनि , आदरे चांगे [10] । सारावे गा ! ।।467।। 10 चांगला आरंभ करून
जे विश्वप्रामाण्याची मुदी[11]। आजि तुझ्या हाती असे सुबुद्धी । 11जगाला विश्वासाला
लोकसंग्रहासि त्रिशुद्धी । योग्यु होसी ।।468।। पात्र अशी मुद्रा
एवं,आसुरवर्गु आघवा ।सांगोनि,तेथिंचा निगावा [12] । 12 सुटका कशी करावी
तोही देवे पांडवा । निरुपिला ।।469।।
इयावरी तो पंडूचा । कुमरु , सद्‌भावो जीवीचा , ।
पुसेल , तो चैतन्याचा । कानी ऐका ।।470।।
संजये व्यासाचिया निरोपा।तो वेळु [13] फेडिला [14] तया नृपा । 13 त्या वेळी 14 उलगडला
तैसा , मीही , निवृत्तिकृपा , । सांगेन तुम्हां ।।471।।
तुम्ही संत माझिया कडा । दिठीचा कराल बहुडा [15] , । 15 वर्षाव
तरी तुम्हा माने [16] येवढा । होईन मी ।।472।। 16 मान्य होईल असा
म्हणौनि , निज अवधान । मज वोळगे [17] , पसायदान [18] । 17 सेवेला 18 प्रसाद
दीजो , जी सनाथु होईन । ज्ञानदेवो म्हणे ।।473।।

**इति श्रीमद्भगवद्‌गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां श्रीकृष्णार्जुनसंवादे दैवासुरसंपद्वि भागयोगो नाम षोडषो ध्यायः।।16।।**

## कठीण ओव्यांचा अर्थ

1. विश्वाच्या आभासास मावळविणारा व अद्वैत स्थितिरूप कमलिनीचा सर्वांदळी विकास करणारा आश्चर्यकारक श्रीगुरुरूपी चित्सूर्य उदयास आला आहे. त्यास आतां वंदन करू .
2. जो श्रीगुरु सूर्य अविद्यारूपी रात्रीचा नाश करून ज्ञान व अज्ञानरूपी चांदण्या नाहीतशा करून टाकतो. ज्ञानी लोकांस आत्मबोधाचा संशय विपर्यरूपी भ्रमात्मक अभ्ररहित आनंदमय मंगलदिन उजाडवितो
3. हा सूर्य उगवल्यावर जीवरूपी पक्ष्यांना ब्रह्मात्मैक्य ज्ञानाचे डोळे प्राप्त होऊन देहात्मत्व भ्रमाची घरटी ते सोडून जातात.
4. श्रीगुरुरूपी सूर्याच्या उदयामुळे वासनात्मक सतरा तत्त्वांच्या लिंगदेहरूपी कमळाच्या पोटात जीवचैतन्यरूपी भ्रमर अज्ञानाने व देहाहंकारामुळे अडकलेला असतो, त्या रूपाने नाश पावणाऱ्या जीव भ्रमराची त्या बंधनापासून मुक्तता होतें
5, शब्दरूप शास्त्रांदिकांच्या दुर्ज्ञेयरुप विसंवादात्मक अडचणीत सापडताच सामान्यज्ञान व विशेषरुप अज्ञान या स्वरूपाची सायंकाळ झाल्यामुळे बुद्धी व बोध हेच कोणी चक्रवाक पक्षी त्या पक्ष्यांच्या जोडप्याची फाटाफूट होऊन ती उभयता जीव आणि ब्रह्म यांच्यातील भेदरुपी नदीच्या दोन्ही तीरांवर विरहाने वेडी होऊन दुःखाने एकमेकांच्या भेटीकरिता ओरडत असतात.
6. बुद्धी आणि बोधरूपी चक्रवाक पक्ष्यांच्या जोडप्याला ऐक्याचे तो समाधान भोगवितो. त्या जोडप्यांना एकत्र मेळवितो. त्या चिदाकाशरूपी भुवनात लावलेला श्रीगुरुरूपी हा जणू एक दीपच आहे .
7. श्रीगुरूरुपी सूर्याच्या उदयाने उजाडलेल्या पहाटेच्या वेळी यच्चयावत भेदाची चोर वेळही कायमचीच संपते. मोक्षमार्गीचे प्रवासी आत्मानुभवाच्या वाटेने निःसंदेहपणे चालावयास लागतात.
8. ज्याच्या आत्मानात्मरूपी किरणांच्या संबंधामुळे ज्ञानरूपी सूर्यकांत मण्यातून उद्दीपित होऊन निघालेल्या ठिणग्या प्रदिप्त होतात व संसाररूपी अरण्ये जाळून टाकतात.
9. ज्याचा प्रखर झालेला योगात्मक किरणसमुदाय ब्रह्मस्वस्वरूपी उखर-माळजमिनीवर स्थिर झाला असता, अष्टमहासिद्धिरूपी मृगजळाचा पूर येतो
10. तें ब्रह्म मी आहे अशा वृत्तिज्ञानात्मक माध्यान्ह काळी केवळ आत्मानुभावरूपी माथ्यावर श्रीगुरूरुपी सूर्य आला असता, देहात्मत्व भ्रांतिरूप छाया, ब्रह्मात्मैक्य बोधरूपी पायाखाली लपून नाहीशी होतें
11. त्यावेळी तेथे मायारूपी रात्रच राहात नाही. तर मग द्वैताभासरूपी स्वप्नासह विपरित ज्ञानरूपी निद्रेस कोण बरे सांभाळणार?
12. म्हणूनच त्या द्वैत आणि त्याचा आभासरूपी भ्रम ही सर्वच त्या अद्वय बोधरूपी नगरात कायमचीच संपतात. महानंदाची विपुलता होऊन आनंदानुभवाची देवघेवही मंद होऊ लागते
13. फार काय सांगावे? याप्रमाणे मुक्तकैवल्यरूपी उत्तम दिवस त्या देहतादात्म्यरहित ब्रह्मस्थितीस पावलेल्या स्थितप्रज्ञास श्रीगुरु सूर्याच्या तेजामुळे, सदा प्रकाशित होतो.
14. श्रीगुरु सूर्य ब्रह्मात्मैक्यरूपी आकाशाचा राजा आहे जो नित्य बोधाने ज्याचा उदयही सदाच असतो; तथापि भ्रमनिवृत्तीनंतर त्याजवर श्रीगुरुमुखातून होणाऱ्या महावाक्योपदेशाच्या रूपाने पुन्हा उदय झाल्याचा व्यवहार मात्र होतो. तो उदय झाल्याबरोबर पूर्व पश्चिमादी दिशांसह उदय व अस्त या सापेक्ष धर्माचे अस्तित्वच नाहीसे करतो.
15. न दिसणे व दिसणे या ज्ञानाज्ञानास जो श्रीगुरु सूर्य नाहीसे करतो. अर्थात भरीव ज्ञानरूप ब्रह्म उरते. फार काय सांगावे! या श्रीगुरुरूपी सूर्याच्या उदयाचा प्रकार हा लौकिक प्रातःकालाहून अत्यंत विलक्षण आहे.

16. जो श्रीगुरु सूर्य दिवस आणि रात्र यांच्या पलीकडील ज्ञानाज्ञानातीत म्हणजे केवळ चित्स्वरूप आहे . तो स्वयंप्रकाश आहे . त्यास विषय करून कुणी बरे पाहावे !

17 जेथ प्रकाश्य पदार्थाविना केवळ चित्प्रकाशाचा सुकाळ आहे त्या श्रीगुरु चित् सूर्य श्रीमन्निवृत्तिनाथांना आतां माझा वारंवार नमस्कार असो ! असे मी श्रीज्ञानदेव म्हणतो. शब्दास व शब्दाच्या सर्व वृत्तीस अविषय असणाऱ्या श्रीगुरुला शब्दद्वारा केलेली स्तुती ही बाधक होईल म्हणून ती शोभत नाही.

18. शब्दातीत असणाऱ्या श्रीगुरुचे अपूर्वत्व जाणून जेव्हा स्तुती करणारा स्तुतिविषय श्रीगुरु, स्तावक वचने आणि स्तव्यबुद्धी यांसह सर्व त्रिपुटी व त्याचा अभिमान नाहीसा होईल तेव्हाच ती स्तुती श्रीगुरु सूर्याच्या योग्यतेच्या मानाने खरीपणास व उत्तमपणास प्राप्त होईल.

19. ज्यास ज्ञेय म्हणून विषयत्वाने न जाणल्यानेच खरे जाणले होतें. जो वाच्यवाचक भावसंबंधरहित असल्यामुळे सापेक्ष मौनासही मिठी देणे हेच ज्याचे खरे वर्णन करणे होय आपण विशेष काहीही न होण्यानेच ज्या श्रीगुरुना आपल्या स्वस्वरूपाचे ठिकाणी आणता येतें मग त्यांची आत्मत्वाने प्राप्ती होतें.

20. त्या तुझ्या स्तुती व ज्ञानाच्या उद्देशाने परेसह पश्यंती मध्यमा वाणीस पोटात घालून वैखरी वाणी ही कायमची विलयास पावते.

21. आपण वाणीला अविषय आहात. त्या आपणास मी सेवकपणाच्या नात्याने शब्दाच्या स्तुतीचे अलंकार घालीत आहे . तरी हें अद्वयानंदरूपी श्रीगुरो, तो माझा एक अपराधच आहे . तो सहन करावा.

31. गीता या नावाने सुप्रसिद्ध तुमचे मधूर असे प्रसादामृतच आहे . गीतेचे व्याख्यान करु शकलो हे तुमच्या माझ्या सुदैवाला दुप्पट सौभाग्य लाभले आहे . म्हणजे ही माझ्या मोठ्या भाग्याची गोष्ट आहे .

60. ज्ञान जेव्हा कामाच्या मोहाने त्याचप्रमाणे होतें ते तामस ज्ञान. हे रागद्वेषांना आश्रय देऊन जी आसुरी संपत्ती निर्माण करते तीचे वर्णन पुढे ऐक.

107. किंवा धूप जसा अग्नीत लय पावतो, अथवा हीणकसाचा नाश झाल्यामुळे जसे सोने वजनांत तुटते किंवा पितरांना अमृताचा आहार देतांदेतां चंद्र जसा क्षय पावतो

161. पाणी जसे तहानलेल्याची तहान शमवण्यास नेह मी तयार असते तसे दयाळु दैवीसंपत्ती युक्त पुरुष दुःखी लोकांचे दुःख दूर करण्यात आपल्याला सार्थ मानतात.

162. असे पुरुष दयेचे मूर्त अवतार असतात.अशांचा मी देव देखील सेवा करतो व ऋण मानतो.

302. तसेच, कुळगोताचा चांगला बारकाईने शोध करून , लहान मुलामुलीचे मंगल मुहुर्तावर लग्न करितात पण लग्नाचा हेतु जर प्रजोत्पत्तीच आहे .

375. वास्तविक पहातां, अर्जुना, यज्ञयागादि सर्व विधिविधाने जशी असावयाची तशीच असतात, परंतु हे आसुर एखाद्या नाटक्याप्रमाणे ढोंगी आचरण करून त्या विधिविधानांना फोल करितात.

401. आणि अभिचाराच्या तडाख्यातुन जे काही दैवयोगाने तगेल, ते त्याच्या दुष्ट निंदेच्या दगडफेकीने हैराण होतें.

428. जो पर्यंत या तिघांचा संचार अंतःकरणात झाला नाही, तो पर्यंत रौरव नरकाची ख्याती पुराणातील पुराणातच राहते.